रायगड, बुधवार, दि. १६ जुलै २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## शशिकांत शिंदे राष्ट्रवादीचे नवे प्रदेशाध्यक्ष

**मुंबई :** शरद पवारांनी भाकरी फिरवली असून, शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जयंत पाटील यांच्या राजीनाम्यानंतर आता पक्षाची धुरा शशिकांत शिंदे यांच्या खांद्यावर देण्यात आली आहे. शशिकांत शिंदे यांची निवड एकमताने करण्यात आली आहे. शशिकांत शिंदे हे शरद पवारांचे विश्वासू नेते मानले जातात. त्यामुळे त्यांना ही संधी मिळाल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची मंगळवारी महत्त्वाची बैठक पार पडली. त्यामध्ये नव्या प्रदेशाध्यक्षपदाची घोषणा करण्यात आली. जयंत पाटील यांनीच शिंदेंच्या नावाचा प्रस्ताव मांडला.

## रायगडावरील पायरी मार्ग १५ ऑगस्टपर्यंत बंद

**महाड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असणाऱ्या ऐतिहासिक किल्ले रायगडावर जाणाऱ्या पायरी मार्गावर बंदी घालण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनानं घेतला आहे. संभाव्य नैसर्गिक आपत्ती आणि अतिवृष्टीमुळं पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी १५ ऑगस्टपर्यंत पायरी मार्ग बंद ठेवण्याचे आदेश रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. पायरी मार्गावर दरडी कोसळण्याची शक्यता लक्षात घेता पर्यटकांच्या जीवित व वित्तहानीचा संभाव्य धोका टाळता यावा, यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून मार्ग बंद केल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# शुभांशू, तुझे सलाम!

## भारतमातेचा सुपुत्र पृथ्वीवर सुखरुप



- कॅलिफोर्नियाच्या समुद्रात ड्रॅगन अंतराळयान उतरलं
- १८ दिवस अंतराळ स्थानकात मुक्काम
- चार अंतराळवीरांची मोहीम यशस्वी
- अंतराळात ६० हून अधिक प्रयोग



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला ४ अंतराळवीरांसह पृथ्वीवर परतले आहेत. त्यांचे ड्रॅगन अंतराळयान कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर उतरले आहे. शुभांशू हे सुमारे १८ दिवस अवकाशात होते, या काळात त्यांनी अनेक प्रयोगही केले. शुभांशू शुक्ला हे २५ जून रोजी फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटर येथून फाल्कन ९ रॉकेटने अंतराळात गेले होते. शुभांशू सुखरूप पृथ्वीवर परतले असून, त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहात होता.**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये वास्तव्य करणारे पहिले भारतीय ठरलेले अंतराळवीर शुभांशू शुक्ला हे १८ दिवसांच्या मोहिमेनंतर सुखरूपपणे पृथ्वीवर परतले आहेत. शुभांशू शुक्ला आणि इतर चार अंतराळवीरांना घेऊन येणारं यान भारतीय प्रमाणवेळेनुसार मंगळवारी दुपारी ३ वाजता कॅलिफोर्नियामधील समुद्र किनाऱ्याजवळ पॅसिफिक महासागरामध्ये सुखरूपपणे उतरले. जगभरातून त्यांच्या कौतुकाचा वर्षाव होत आहे.

शुभांशू शुक्ला हे ॲक्सिओम मिशन ४ या मोहिमेचा भाग होते. त्यांनी १८ दिवस अंतराळात वास्तव्य करताना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये विविध प्रयोग केले. दरम्यान, मंगळवारी स्पेसएक्सचे ग्रेस हे यान शुभांशू शुक्ला यांच्यासह इतर चार जणांना घेऊन सुखरूप पृथ्वीवर परतले. शुभांशू शुक्ला हे अमेरिका, पोलंड, हंगेरीतील आपल्या ३ सहकारी अंतराळवीरांसह २५ जून २०२५ रोजी ड्रॅगन या अंतराळ यानामधून फाल्कन ९ या रॉकेटच्या मदतीने अंतराळात गेले होते. २६ जून रोजी ते आंतरराष्ट्रीय अंतराळ स्टेशनमध्ये पोहोचले. तिथे शुभांशू शुक्ला यांनी ६० हून अधिक शास्त्रीय प्रयोग केले. त्यामध्ये अंतराळात स्नायूंचं होणारं नुकसान, मानसिक

पान २ वर

> ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला त्यांच्या ऐतिहासिक अंतराळ मोहिमेतून पृथ्वीवर परतत असताना त्यांचं मी स्वागत करतो. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे भारताचे पहिले अंतराळवीर म्हणून, त्यांनी त्यांच्या समर्पण, धैर्य आणि अग्रगण्य भावनेने अब्जावधी स्वप्नांना प्रेरणा दिली. हे आपल्या अंतराळ उड्डाण मोहिमेच्या दिशेने आणखी एक मैलाचा दगड आहे. – पंतप्रधान नरेंद्र मोदी

### भारताचे दुसरे अंतराळवीर

शुभांशू शुक्ला हे १९८४ नंतर अंतराळात जाणारे भारताचे दुसरे अंतराळवीर आहेत. यापूर्वी राकेश शर्मा यांनी १९८४ मध्ये सोव्हिएत युनियनच्या अंतराळयानातून अंतराळात प्रवास केला होता. शुभांशू यांच्या या मोहिमेनंतर भारत आगामी काळात अंतराळ स्थानक स्थापन करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे शुभांशू यांची ही मोहीम खास आहे.

### कोण आहेत शुभांशू?

शुभांशू शुक्ला हे भारतीय हवाई दलात स्क्वाड्रन कमांडर आहे. त्यांना २००० तासांपेक्षा जास्त उड्डाणाचा अनुभव आहे. शुभांशू यांनी आपल्या १८ दिवसांच्या अंतराळातील कार्यकाळात ६० हून अधिक प्रयोगांमध्ये भाग घेतला आहे. ज्यात भारताच्या ७ प्रयोगांचा समावेश आहे. शुभांशू यांनी अंतराळात मेथी आणि मूगाचे बीजचा अभ्यास केला.

# रायगडात ‘महिलाराज’

## सरपंच आरक्षण सोडतीवर महिलांनी फडकाविला झेंडा

## अलिबागमध्ये ६२ पैकी ३१ ग्रामपंचायतींवर महिलांना संधी

**। अलिबग । प्रमोद जाधव ।**

**रायगड जिल्ह्यात दोन महिन्यांपूर्वी सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झालेल्या ८१० ग्रामपंचायतींसाठी २०२५ ते २०३० या कालवधीकरिता सरपंचपदाचे आरक्षण पुन्हा नव्याने काढण्यात आले. जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षण निश्चितीचा कार्यक्रम मंगळवारी (दि. १५) प्रांताधिकारी, तहसीलदार यांच्या उपस्थितीत पार पडला. दरम्यान, जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायतींवर महिला आरक्षण पडल्याने महिलांच्या हाती कारभार जाणार असल्याचे निश्चित झाले आहे. सत्तेची खुर्ची महिलांना मिळणार असल्याने गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असणाऱ्या इच्छुकांचे मनसुबे धुळीस मिळाले आहेत. रायगडात महिलाराज अवतरणार असल्याने महिलांनी आनंदोत्सव साजरा केला. मात्र, संधी हुकल्याने अनेकांना नाराजी लपवता आली नाही. आरक्षण सोडतीदरम्यान विविध पक्षाचे पुढारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



● अलिबागमधील जिल्हा नियोजन भवनमध्ये मयुरा महेंद्र महाडिक या चिमुकलीच्या हस्ते चिठ्ठी काढून सोडत पद्धतीने आरक्षण जाहीर करण्यात आले. तहसीलदार विक्रम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया पार पडली. (छायाचित्र : समीर मालोदे) सविस्तर वृत्त पान २ वर

### प्रस्थापित इच्छुक हिरमुसले

**नव्याने जाहीर झालेल्या सरपंच आरक्षण सोडतीत अनेक ठिकाणी प्रस्थापितांना धक्का बसला आहे. सरपंच पदाचा आरक्षण कोटा नव्याने जाहीर झाल्यामुळे पुन्हा राजकीय समीकरणे बदलणार आहेत. मात्र, यामुळे इच्छुकांच्या आशा-आकांक्षांवर पाणी पडले आहे.**

तालुक्यातील ३१ ग्राम पंचायतींवर महिला राज असणार आहे. त्यामुळे ज्यांनी सरपंच होण्याचे स्वप्न पाहिले होते, ते स्वप्न भंग पावले. काही ग्राम पंचायतीवर सरपंच पदाचे आरक्षण खुले पडले. त्यामुळे काहींनी नाराजी व्यक्त केली. तर काहींनी आनंद साजरा केला. ज्या ग्रामपंचायतींवर पहिल्यापासूनच सत्ता होती,



त्या ग्रामपंचायतीवर आता उभे राहण्याची संधी अनेकांना मिळणार आहे.

दरम्यान, खानाव व चेंढरे ग्रामपंचायतीच्या आरक्षण पदावरून अनेकांनी नाराजी व्यक्त केली. त्यावेळी मुकेश चव्हाण यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्या प्रश्नांचे निरसन उदाहरणासहित करून दिले. त्यामुळे काही वेळ आरक्षण निश्चितीच्या सभेमध्ये गदारोळझाल्याचे दिसून आले. तालुक्यातील आंबेपूर, नवेदर नवगाव, खंडाळे, शहाबाज, कुरकोंडी कोलटेंभी, खानाव, कुर्डूस रेवदंडा, आक्षी, कावीर, चिंचोटी, पेढांबे, ढवर, मानकुळे, मानतर्फे झिराड, झिराड, चेंढरे, थळ, किहीम, मापगांव, वेश्वी, वाघोडे, शिरवली, चौल, रांजणखार- डावली, नारंगी, सासवणे, कुसूंबळे, परहूर, खिडकी, रामराज या ग्रामपंचायतींवर महिलांमार्फत गावांचा कारभार चालणार आहे. तसेच सातिर्जे, वाडगाव, बामणगाव, चिंचवली, मुळे, रेवस, आगरसुरे, कामार्ले, बेलोशी, बेलकडे, कुरूळ, सहाण, धोकवडे, बोरिस, मिळकतखार, सारळ, सुडकोली, बोरघर, पोयनाड, वाघ्रण, वरंडे, ताडवागळे, कोप्रोली, श्रीगांव, चरी, वरसोली, आवास, वैजाळी, शहापूर, नागाव, पेझारी या ग्रामपंचायतीवर पुरुषांची सत्ता असणार आहे.

### तालुकानिहाय आरक्षणात महिलांची बाजी

| तालुका | ग्रामपंचायती |
|---|---|
| अलिबाग | 62 पैकी 31 |
| पेण | 64 पैकी 32 |
| पोलादपूर | 41 पैकी 11 |
| कर्जत | 55 पैकी 28 |
| उरण | 35 पैकी 17 |
| म्हसळा | 39 पैकी 19 |
| मुरुड | 24 पैकी 12 |
| खालापूर | 45 पैकी 22 |
| तळा | 25 पैकी 14 |
| माणगाव | 74 पैकी 37 |

### असे असेल अलिबागचे आरक्षण

अनुसूचित जाती महिलांसाठी – आंबेपूर. अनुसूचित जमाती महिलांकरिता– काविर, चिंचोटी, पेढांबे, ढवर, मानतर्फे झिराड, मानकुळे. नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी– नवेदर नवगाव, खंडाळे, शहाबाज, कुरकोंडी कोलटेंभी, खानाव, कुर्डूस रेवदंडा, आक्षी. सर्वसाधारण महिलांसाठी– झिराड, चेंढरे, थळ, किहीम, मापगाव, वेश्वी, वाघोडे, शिरवली, चौल, रांजणखार– डावली, नारंगी, सासवणे, कुसूंबळे, परहूर, खिडकी, रामराज. अनुसूचित जमातीसाठी खुला– आवास, वैजाळी, शहापूर, नागाव, पेझारी. खुल्या जागांसाठी– बेलकडे, कुरूळ, सहाण, धोकवडे, बोरीस, मिळकतखार, सारळ, सुडकोली, बोरघर, पोयनाड, वाघ्रण, वरंडे, ताडवागळे, कोप्रोली, श्रीगांव, चरी, वरसोली. नागरिकांचा मागास प्रवर्ग खुल्या जागांसाठी– सातिर्जे, वाडगाव, बामणगाव, चिंचवली, मुळे, रेवस, आगरसुरे, कामार्ले, बेलोशी.

# रायगडात पावसाचे धूमशान

- अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत
- अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या
- सावित्री, कुंडलिका नद्यांनी गाठली धोका पातळी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात सोमवारी रात्रीपासून पावसाने धूमशान घातले असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. मागील पंधरा दिवसांपासून गायब झालेला पाऊस पुन्हा एकदा सक्रीय होत जोरदार कोसळत आहे. दरम्यान, हवामान विभागाने जिल्ह्याला रेड अर्लट दिला आहे. पाऊस सुरू झाल्याने शेतकरी सुखावले. मात्र, या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. रस्ते, पूल, पाण्याखाली गेले. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरले. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला. नदी, नाले पाण्याने ओसंडत वाहत होते. पूरजन्यपरिस्थिती निर्माण झाली होती. दरड कोसळण्याच्या घटना घडल्या. त्यामुळे वाहतूक तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली. अलिबाग, तळा, महाड, रोहा, पोलादपूर, म्हसळा या तालुक्यांना पावसाचा मोठा फटका बसला आहे.

जिल्ह्यात काही प्रमाणात पावसाने विश्रांती घेतली होती. लावणीचा पान २ वर

### सावित्री, कुंडलिका धोका पातळीवर

सावित्री आणि कुंडलिका नदीने धोका पातळी ओलांडली आहे. त्या भागात अलर्टचा इशारा दिला आहे. रोहामध्येदेखील जोरदार पाऊस आहे. जिल्ह्यातील महाडमधील सावित्री नदीमध्ये ६.६० मी. रोहामधील कुंडलिका २४.२५ मीटर इतकी पाण्याची पातळी वाढली आहे. या दोन्ही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. रोहामधील आंबा नदीमध्ये ८.७० मी., खालापूरमधील पाताळगंगा नदीमध्ये १९.५५ मी., कर्जतमधील उल्हास नदीमध्ये ४४.३५ मी. पनवेलमधील गाढी नदीमध्ये ३.०५ मी. इतका पाण्याचा साठा आहे. अंबा नदीने इशारा पातळी ओलांडली असून, उल्हास, गाढी, पाताळगंगा नदयांमध्ये इशारा पातळीपेक्षा कमी पाणी असल्याची माहिती लघुपाटबंधारे विभागाने दिली आहे.



## सात वर्षीय मुलीचा विनयभंग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तळोजा भागात राहणाऱ्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलाने शेजारच्या इमारतीत जाऊन तेथील सात वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याचा प्रकार उघडकीस आला. तळोजा पोलिसांनी या अल्पवयीन मुलाविरोधात विनयभंग तसेच पोक्सोनुसार गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

या घटनेतील अल्पवयीन मुलगा तळोजा फेज-२ भागात राहण्यास आहे. तो खेळता खेळता बाजूच्या इमारतीत गेला होता. यावेळी त्याने या ठिकाणी खेळत असलेल्या सात वर्षीय मुलीला पकडून उद्धावाहनाच्या ठिकाणी नेत तिच्यासोबत अश्लील चाळे करून तिचा विनयभंग केला.

## उरणमध्ये वाढती नशेखोरी

**। उरण । प्रतिनिधी ।**



- अल्पवयीन मुलं गांजा-ड्रग्जच्या आहारी
- पालक, पोलीस आणि यंत्रणा अद्याप झोपेत?

वीर सावरकर मैदान, एनआय हायस्कूलसमोरील ग्राऊंड, पिरवाडीचा समुद्रकाठ, फुंडे रेल्वे कॉलनी आणि भिवंडीवाला गार्डनसारखी ठिकाणं, पानटपरीच्या आडून सर्रास अंमली पदार्थांचा सौदा सुरू आहे. आणि या सौद्याचे ‘ग्राहक’ म्हणजे १४ ते २५ वयोगटातील अल्पवयीन विद्यार्थी आणि बेरोजगार युवक आज नशेच्या आहारी जाऊन बिनधास्त फिरताना दिसत आहेत. आई-वडिलांची बेफिकिरी, पोलीस प्रशासनाचा ढिसाळपणा आणि शिक्षण संस्थांची ठरवून घेतलेली तटस्थता या सगळ्यांचा स्फोटक परिणाम म्हणजे उरणमधील नशेखोरीची ही अघोषित साथ, असे चित्र उरणमध्ये दिसत आहे.

विडी-सिगरेटपासून सुरू झालेली व्यसनांची वाट आता थेट गांजा, चरस, कोकेन, हिरॉईन, थिनर, लोडेक्स बाम, व्हाइटनर, पेनकिलर, पान २ वर

# सारा नर्सिंग महाविद्यालयाची परवानगी तात्काळ रद्द करा

## डॉ. बाबासाहेब देशमुख यांची अधिवेशनात मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

इंडियन नर्सिंग कौन्सिल आणि महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची परवानगी न घेता, रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील सारा नर्सिंग कॉलेज चालविले जात आहे. बेकायदेशीररित्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. परवानगी नसताना चालविल्या जाणाऱ्या महाविद्यालयाची परवानगी रद्द करण्यात यावी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होऊ नये, म्हणून विद्यार्थ्यांना अन्य महाविद्यालयात पाठविण्यात यावे, अशी मागणी शेकापचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली आहे. अधिवेशनात याबाबत आवाज उठवून हा प्रश्न तातडीने सोडविण्यात यावा, अशी सभागृहाकडे मागणी केली.



सारा नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थ्याने तीन जून २०२५ मध्ये महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. जाचाला कंटाळून त्याने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना घडून एक महिना उलटून गेला आहे. याबाबत पोलीस यंत्रणेने कोणती चौकशी केली, या चौकशीत काय आढळून आले, संबंधितांविरोधात कारवाई केली का, असा सवाल डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त करीत तपासाबाबत नाराजी व्यक्त केली.

पनवेल येथे सारा नर्सिंग महाविद्यालय अनेक महिन्यांपासून चालू आहे. या महाविद्यालयाला कोणत्या कागदपत्रांच्या आधारे परवानगी देण्यात आली, असा प्रश्न बाबासाहेब देशमुख यांनी उपस्थित करीत पान २ वर



**गणेशोत्सवासाठी पाच हजार जादा एसटी बसेस** | **एसटी महामंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय**

# कोकणवासियांना गणपती पावला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अवघ्या काही दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला आहे. आपल्या लाडक्या बाप्पााच्या स्वागतासाठी प्रत्येक चाकरमानी हा कोकणात गावी जात असतो. गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळ पूर्णपणे सज्ज झाले आहे. यंदाच्या गणेशोत्सवासाठी तब्बल पाच हजार जादा गाड्या सोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. येत्या २७ ऑगस्ट रोजी गणपती बाप्पाचे आगमन होत असून, यासाठी खास २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत एसटी बस उपलब्ध असणार आहेत.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.



गणेशोत्सव २०२५ ची तयारी म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान मुंबईहून कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी पाच हजार अतिरिक्त बससेवा सुरू करणार आहे. या अतिरिक्त बसेससाठी आरक्षण करण्यासाठी अधिकृत वेबसाइट (npublic.msrtcors.com), बस डेपो किंवा एसटीचा मोबाईल ॲपवरून करता येईल. या विशेष बसेस मुंबई, ठाणे, पालघर आणि इतर महत्त्वाच्या केंद्रांवरून सोडण्यात येणार आहेत. गट आरक्षण २२ जुलैपासून सुरू होणार असून, त्यावर प्रवाशांना भाडे सवलती मिळणार आहेत.

### वाहनदुरुस्ती पथकंही तैनात असणार

**येत्या २३ ऑगस्टपासून मुंबई, ठाणे, पालघर या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून जादा बसेस कोकणासाठी सुटतील. गेल्या वर्षी ४३०० बसेस सोडण्यात आल्या होत्या, त्या तुलनेत यंदा ७०० बसेसची वाढ करण्यात आली आहे. गणेशोत्सवादरम्यान एसटीची वाहतूक सुरळीत चालावी यासाठी बसस्थानके आणि बसथांब्यांवर एसटीचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच, कोकणातील महामार्गांवर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथके (ब्रेकडाऊन व्हॅन) देखील तैनात करण्यात येणार आहेत, जेणेकरून प्रवाशांना कोणतीही अडचण येऊ नये, असेही प्रताप सरनाईक यांनी सांगितले.**

### २२ जुलैपासून आरक्षण करता येणार

**या जादा बसेसमध्ये व्यक्तिगत आरक्षणासोबतच गट आरक्षणाची सोयही उपलब्ध असेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के तिकिट दरात सवलत मिळणार आहे, तर ज्येष्ठ नागरिकांना आणि महिलांना ५० टक्के तिकिट दरात सवलत दिली जाणार आहे. गट आरक्षणाची प्रक्रिया २२ जुलैपासून सुरू होत आहे.**

# पोलादपुरात ४२ ग्रामपंचायतींची आरक्षण सोडत

## ■ २०२५-३० पंचवार्षिक निवडणुकीसाठी आरक्षण लागू

**। पोलादपूर । शैलेश पालकर ।**

तालुक्यातील ४२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची गेल्या २५ एप्रिल २०२५ रोजी सोडत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहात काढण्यात आल्यानंतर सोमवार, दि. १५ जुलै रोजी कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये दुसऱ्यांदा सोडत काढण्यात आली. याप्रसंगी पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे, गटविकास अधिकारी दिप्ती गाट व्यासपीठावर उपस्थित होते.




अनुसूचित जाती महिलांसाठी ३ सरपंचपदांचे आरक्षण महाळुंगे आणि कापडे खुर्द व माटवण अनुसूचित जाती खुला, अनुसुचित जमातीसाठी ३ सरपंच पदांचे आरक्षण देवपूर महिला, कापडे बुद्रुक, भोगाव खुर्द, नामाप्र सर्वसाधारण सरपंच पदाचे आडावळे बुद्रुक, पैठण, तुर्भे खोंडा, ओंबळी, वझरवाडी या ५ ग्रामपंचायतींचे आरक्षण तर नामाप्र महिलांसाठी धामणदिवी, परसुले, गोळेगणी, तुर्भे खुर्द, काटेतळी, कालवली या ६ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी ग्रामपंचायतींचे सरपंचपद आरक्षित करताना धारवली, बोरघर, पांगळोली, वाकण, दिविल, चरई, मोरसडे, पळचिल, कुडपण बुद्रुक, लोहारे, चांभारगणी बुद्रुक, कोतवाल खुर्द, या १२ ग्रामपंचायती तर बोरज, पार्ले, उमरठ, मोरगिरी, देवळे, कोंढवी, तुर्भे बुद्रुक, महालगूर, गोवेले, सवाद, बोरावळे, कोतवाल बुद्रुक, सडवली या १३ ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण सर्वसाधारण जाहीर झाले.

२५ एप्रिल २०२५ रोजी सोडत काढताना बोरावळे नामाप्रचे आरक्षण बदलून सर्वसाधारण खुले झाले आहे, तर गोवेले सर्वसाधारण महिला आरक्षण बदलून सर्वसाधारण खुले आरक्षण झाले आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे बोरावळे ग्रामपंचायतीचे सरपंच भाजपचे तालुका मंडळ अध्यक्ष झाले आहेत आणि गोवेले येथे शिवसेनेचे तालुकाप्रमुख असे महायुतीचे प्रमुख पदाधिकारी आहेत. यावेळी सोडत काढण्यासाठी जनसेवा विद्यालयाची एक विद्यार्थिनी उपस्थित होती.

या सोडतीवेळी पोलादपूर तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सरपंच, ग्रामविकास अधिकारी, कार्यकर्ते आणि उपगटविकास अधिकारी हंबीर, नायब तहसिलदार सानप, अव्वल कारकून आणि महसूल कर्मचारी उपस्थित होते.




# २८ ग्रामपंचायतींमध्ये महिलांची सत्ता

**। नेरळ । संतोष पेरणे ।**

कर्जत तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतींमधील २०२५ ते २०३० या कालावधीत थेट सरपंचपदाचे आरक्षण काढण्यात आले. ५५ पैकी २८ ग्रामपंचायती या महिलावर्गासाठी राखीव असून, पोशीर आणि अंजप यांचे प्रश्न नवीन आरक्षणामध्ये देखील कायम आहेत.

मंगळवारी कर्जत येथील प्रशासकीय भवनमध्ये आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यावेळी प्राधिकृत अधिकारी म्हणून डॉ. धनंजय जाधव यांच्यासह निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत, कर्जतचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, निवडणूक नायब तहसीलदार कोटुंबे आदी उपस्थित होते. यावेळी सहा वर्षीय ओवी रामदास लोभी या विद्यार्थिनीच्या हस्ते चिठ्ठी काढून सोडत काढण्यात आली.

तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतींपैकी दोन ग्रामपंचायती अनुसूचित जातीसाठी राखीव असून, त्यातील एक ग्रामपंचायत महिला राखीव तर अनुचित जमातीसाठी १६ ग्रामपंचायती राखीव ठेवण्यात आल्या असून, त्यातील आठ ग्रामपंचायती या महिला राखीव आहेत. तर, नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी १५ ग्रामपंचायती आरक्षित ठेवण्यात आल्या असून, त्यातील सात ग्रामपंचायत महिला राखीव म्हणून आरक्षित करण्यात आल्या आहेत. तर सर्वसाधारणमध्ये २२ ग्रामपंचायती असून, त्यातील १२ महिला राखीव आणि अन्य सर्वसाधारण असणार आहेत. अनुसूचित जाती.. २ मांडवणे आणि कोंडीवडे (महिला), अनुसूचित जमाती.. १६ पैकी अनुसूचित जमाती सर्वसाधारण ८, बोरिवली, वारे, साळोख तर्फे वरेडी, पोशीर, रजपे, शेलू, खांडपे, पाषाने. महिला राखीव ८ भालिवडी, कशेळे, अंजप, बीड बुद्रुक, कळंब, शिरसे, आसल, वैजनाथ. नागरिकांचा मागास प्रवर्ग १६ पैकी ओबीसी सर्वसाधारण ८ अंभेरपाडा, मोगरज, ओलमन, खांडस, भिवपुरी, जामरंग, पिंपळोली, नेरळ. महिला राखीव ७ नांदगाव, पळसदरी, वरई तर्फे नीड, हुमगाव, पाथरज, जिते, पाली खलाटी. सर्वसाधारण २२ पैकी १०- तिवरे, ममदापूर, दहिवली तर्फे वरेडी, पोटल, वदप, गौरकामत, चिंचवली, नसरापूर, वेणगाव,उकरूळ. महिला सर्वसाधारण १२- उमरोली, कोल्हारे, किरवली, सावेळे, माणगाव तर्फे वरेडी, सावळे, वाकस, हालिवली, वावलोली, मानिवली, दामत, कडाव.

# ३९ पैकी १९ ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच

**। म्हसळा । उदय कळस ।**

न्यू इंग्लिश स्कूल सभागृहात म्हसळा तालुक्यातील ३९ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडत म्हसळा तहसीलदार सचिन खाडे यांनी जाहीर केले. ३९ ग्रामपंचायतींपैकी १९ ग्राम पंचायत मध्ये महिलाना सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

सरपंचपदाचे आरक्षण सोडत चिठ्ठी कुमारी अपेक्षा महेश धोत्रे या सहा वर्षीय चिमुकलीच्या हस्ते काढण्यात आल्या. आरक्षण सोडतीत प्रामुख्याने पाभरे ग्राम पंचायत - अनु.जमाती स्त्री, खारगाव खुर्द - ना मा.प्र., खारगाव बुद्रुक - सर्व साधारण, देवघर - सर्साधारण, जांभुळ -ना मा.प्र.,खारगाव बुद्रुक - सर्व साधारण, देवघर - सर्साधारण, जांभुळ - नामाप्र.स्त्री, नेवरूळ - सर्साधारण, घूम सर्वसाधारण स्त्री, केल्टे- नामाप्र, मेंदडी सर्वसाधारण स्त्री, खरसई - सर्वसाधारण, गोंडघर - सर्वसाधारण, वारळ- सर्वसाधारण, तुरूंबाडी - सर्वसाधारण, रोहिणी -नामाप्र, वरवठणे - नामाप्र, रेवळी- नामाप्र स्त्री, साळविंडे - सर्वसाधारण स्त्री, तोंडसुरे - सर्वसाधारण स्त्री,निगडी - सर्वसाधारण स्त्री,कांदलवाडा - नामाप्र स्त्री,घोणसे - सर्वसाधारण स्त्री, चिखलप - सर्वसाधारण, भेकऱ्याचा कोंड - सर्वसाधारण स्त्री, काळसुरी- सर्वसाधारण स्त्री, खामगाव - अनुसूचित जाती स्त्री, लेप -अनुसूचित जमाती, आंबेत- नामाप्र स्त्री,संदेरी - अनुसूचित जमाती स्त्री,कणघर - सर्वसाधारण, कुडगाव- अनुसूचित जमाती, फळसप - नामाप्र स्त्री, पांगलोळी- सर्व साधारण स्त्री, तोराडी- नामाप्र,कोलवट - सर्व साधारण स्त्री,ठाकरोळी- सर्व साधारण, वावे - सर्व साधारण, मांदाटणे - सर्व साधारण स्त्री, कोळे - अनुसूचित जमाती, आडी महाड खाडी - नामाप्र अशा प्रकारे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.



# २४ ग्रामपंचायतीचे सरपंच आरक्षण जाहीर

**। आगरदांडा । गणेश चोडणेकर ।**

मुरूड तालुक्यातील २४ ग्रामपंचायतींचे सरपंच आरक्षण मुरुड तहसीलदार आदेश डफळ यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीमधील डॉ.ति.श्री. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात घेण्यात आली. यावेळी मुरुड तहसीलदार यांनी २४ ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच आरक्षण २०२५ ते २०३० या कालावधीसाठी सरपंच आरक्षणाबाबत माहिती दिली.

यामध्ये विहुर ग्रामपंचायत थेट सरपंचकरिता सोडतीशिवाय अनु. जाती महिला आरक्षण घोषित करण्यात आले. नागरिकांचा मागास प्रवर्ग १७ ग्रामपंचायत सरपंचकरिता सर्वांच्या समोर प्लास्टिक डब्यात १७ चिठ्ठ्या टाकण्यात आल्या. या डब्यातून चौथीत शिकणारा विद्यार्थी उजेफा शरफात शेख यांनी एक-एक करत चिठ्ठ्या उचल्या. यामध्ये कोर्लई, मजगाव, शिघ्रे, साळाव, मिठेखार, मांडला तर आंबोली ग्रामपंचायत सोडतीशिवाय नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण घोषित करण्यात आले. सर्वसाधारण आरक्ष करिता ८ ग्रामपंचायतीमधून तेलवडे, चोरढे या २ ग्रामपंचायत सोडत करण्यात आली. ग्रामपंचायत सरपंच पदाकरीता अनु .जमाती खुला यामधून बोर्ली, एकदरा राजपुरी, तर ग्रामपंचायत सरपंच पदाकरिता अनु.जमाती महिलाकरिता वळके व तळेखार असणार आहे.




ग्रामपंचायत सरपंच पदाकरीता नागरिकांचा मागास प्रवर्ग खुला कोर्लई, मजगाव, शिघ्रे तर ग्रामपंचायत सरपंच करिता नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला आंबोली, साळाव, मिठेखार, मांडला असणार आहे.

ग्रामपंचायत सरपंच पदाकरिता सर्वसाधारण खुलाकरिता सावली, उसरोली, आगरदांडा, वेळास्ते, काशिद, काकळघर, तर ग्रामपंचायत सरपंच पदाकरीता सर्वसाधारण महिलाकरिता वावडुंगी, नांदगाव, भोईघर, चोरढे, तेलवडे हे असणार आहे.

# तळा तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**। तळा । श्रीकांत नांदगावकर ।**

गाव वाड्यातील मिमी मंत्रालय असलेल्या २५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत आज दि. (१५ जुलै) तहसीलदार स्वाती पाटील यांनी जाहीर केले. पंचायत समिती डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात नायब तहसीलदार श्री. पालांडे, निवडणूक नायब तहसीलदार श्री. टेंबे महसूल नायब तहसीलदार श्री. पाटील विविध गावातील सरपंच पदाचे ईच्छुक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आरक्षण सोडतीमध्ये अनेक इच्छुकांना फटका बसला आहे.

१. अनुसूचित जाती (एससी) साठी: निगुडशेत, २. अनुसूचित जाती (महिला) साठी: वांजळोशी, ३. अनुसूचित जमाती (एसटी) साठी: मेढे, पिटसई, ४. अनुसूचित जमाती (महिला) साठी: बोरघर हवेली, महागाव, ५. नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) साठी : मालुक, वरळ, रोवळे, तळेगाव, ६. नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) साठी : चरईखुर्द, शेणवली, गिरणे, ७. सर्वसाधारण साठी: काकडशेत, पडवण, भानंग, मांदाड, रहाटाड, ८. सर्वसाधारण (महिला) साठी : मजगाव, उसर खुर्द, पन्हेळी, सोनसडे, वनास्ते, कर्नाळा फळशेत, वाशी हवेली.

# ३५ पैकी १७ ग्रामपंचायतींवर महिलाराज

**। उरण । अनंत नारंगीकर ।**

तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे आरक्षण मंगळवार, दि. १५ रोजी सोडत पद्धतीने काढण्यात आले. उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्या अध्यक्षतेखाली ही सरपंच आरक्षणाची सोडत पार पडली. या सोडतीत ३५ पैकी १७ ग्रामपंचायतींमध्ये महिला राज येणार आहे. या आरक्षण सोडतप्रसंगी निवासी नायब तहसीलदार महेश पाटील, नायब तहसीलदार नरेश पेडवी, नायब तहसीलदार रवींद्र सानम, माजी सभापती विश्वास म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद म्हात्रे आदी हजर होते.

महिला आरक्षणापैकी उरण तालुक्यातील सर्वात मोठी ग्रुप ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या चाणजे ग्रामपंचायतीचे आणि चिर्ले ग्रामपंचायतीचे सरपंचपद अनुसूचित जमातीसाठी आणि रानसई ग्रा.पं.चे सरपंच पद अनुसुचित जमाती (महिला) राखीव झाले आहे. विंधणे, सारडे, पागोटे, बांधपाडा, फुंडे, गोवठणे, पाणजे, धुतूम, चिरनेर, पुनाडे, नवघर या ग्रामपंचायतीत सर्वसाधारण महिलांचे आरक्षण पडले आहे. केगाव, पिरकोन, बोकडविरा, मोठी जुई आणि कळंबुसरे येथे नामाप्र (महिला) सरपंच पदाचे आरक्षण आले आहे. कोप्रोली, भेंडखळ, जसखार, घारापुरी, वशेणी, आवरे, दिघोडे, करळ, डोंगरी, नवीन शेवा आणि नागाव येथे सर्वसाधारण (खुला) सरपंच होणार आहे. नामाप्र (खुला) प्रवर्गासाठी हनुमान कोळीवाडा, वेश्वी, म्हातवली आणि सोनार ग्रामपंचायतीचे आरक्षण पडले आहे.




**Saraswati Education Society Mumbai**
**Sau Vandana N Tasgaonkar Ayurveda mahavidyalaya & Sanshodhan Kendra**
**Chandhai Ta. Karjat Dist Raigad (Maharashtra)**
Phone numbers :- 8779695870, 9769161995,9920763768,
Affiliated to National Commission of Indian System of Medicine New Delhi, Maharashtra University of Health Sciences, Nashik. Permitted by Govt of Maharashtra Mumbai

**Wanted**

Applications are invited for filling up the following posts in the College / Institute.

| Sr.No. | Subject | Professor | Associate Professor/ | Assistant Professor/ |
|---|---|---|---|---|
| 1 | Dept. of Rachanasharir | | 1 (Open) | 0 |
| | Total | | 1 | 0 |

**Note**
1 Interview will be conducted by Local Management Committee of Saraswati Mumbai and will MUHS Nashik will send to MUHS Nashik for temporary aproval for 2 years.
2 All the intrested candidates should attend walk in interview on 16 February 2025 between 9 AM to 1 PM with all original certificates and certified attested documents.
3 Terms, Conditions and Salary as per MUHS & Saraswati Education Society rules.
4 University temporary aproval for 2 years will get after aproval of MUHS Nashik.

**Chairman**
**Saraswati Education Society**

## पान १ वरून

## शुभांशू, तुझे सलाम!

आरोग्य आणि अंतराळात धान्य रुजवण्यासारख्या प्रयोगांचा समावेश आहे.

दरम्यान, कॅलिफोर्नियातील समुद्र किनाऱ्याजवळ शुभांशू शुक्ला आणि इतर अंतराळवीरांना घेऊन येणारं यान उतरल्यानंतर सर्व अंतराळवीरांना यानातून सुखरूपपणे बाहेर काढून वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले. आता त्यांना सुमारे १० दिवस क्वारंटाईनमध्ये ठेवलं जाईल. यादरम्यान, त्यांच्या प्रकृतीवर बारीक लक्ष ठेवलं जाईल.

## रायगडात पावसाचे धूमशान

हंगाम सुरू झाला होता. परंतु, शेतामध्ये पाणी नसल्याने लावणीची कामे खोळंबली होती. पावसाची प्रतीक्षा लागून राहिली होती. अखेर पाऊस सोमवारपासून सुरू झाला. घाटमाथ्यावर मध्यम व व तुरळक स्वरुपाचा पाऊस पडला. सावित्री अंबा, कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे सर्व शासकिय यंत्रणांना व नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला.

पावसात मंगळवारी सकाळी अलिबाग-तळा मार्गावरील पुलावरून पाणी वाहू लागल्याने वाहतूक बंद करण्यात आली. अतिवृष्टीमुळे सावित्री नदीचे पाणी महाड शहरामध्ये शिरले. रावढळ पुलावरून पाणी वाहत असल्याने या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली. विन्हेरी येथील नागेश्वरी नदीमध्ये तुडूंब पाणी भरले. गावातील मल्लिकार्जून मंदिराजवळील पुलावरून वाहू लागले. महाडमधील रायगडकडे जाणाऱ्या दस्तुरी मार्गावर पाणी आल्याने हा मार्ग बंद करण्यात आला. अलिबाग शहरातील पीएनपी नगर, अलिबाग एसटी स्थानक परिसर पाण्याने भरला. त्यामुळे प्रवाशांसह चालकांचेदेखील प्रचंड हाल झाले.

भिसेखिंडीमध्ये दरड कोसळून डोंगरावरचे झाड रस्त्यावर उन्मळून पडले. जेसीबीच्या सहाय्याने झाड बाजूला काढण्यात आले. रोहा-भालगाव या रस्त्यावर तांबडी, भिसेखिंड, मेढा, महाळुंगे, कुंभोशी या ठिकाणी माती रस्त्यावर आली आहे. रोहा तालुक्यातील वरसे, भुवनेश्वर या परिसरातील काही घरांमध्ये पाणी शिरले आहे. महादेवखारमध्ये दरड कोसळल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. आंबेवाडी नाका कोलाड नाक्यावर दुकानांमध्ये, शिरवली गावांमध्येपाणी शिरले असून, नागोठणे येथील चिकणी ते रेल्वे पुलापर्यंत मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे.

पोलादपूरमधील आंबेनळी घाटात दरड कोसळली आहे. त्यामुळे मार्गावरील वाहतूकीवर परिणाम झाला आहे. वाहनांचे नुकसान होऊ नये, म्हणून या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. भोराव, सवाद, धारवली, मुख्य रस्त्यावर, माटवन येथे पाणी भरल्याने या गावांचा संपर्क तुटला आहे. ओंबळी येथे घरांजवळ माती घसरली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी नसल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. म्हसळा येथील ढोरजे येथील नदीच्या पुलावरून पाणी वाहात असल्याने या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. या पावसात अनेक भागातील पुलांवरून पाणी वाहत असल्याने वाहतूक सेवा बंद केली. त्याचा फटका विद्यार्थी, व अन्य प्रवाशांना बसला आहे.

**रामराज पाण्याखाली**

जिल्हयात रात्रीपासून सुरु असलेल्या पावसामुळे अनेक नद्या, नाले, पाण्यांनी भरून गेले. तालुक्यातील रामराज नदीतील पाणी रामराज बाजारपेठांसह गावात शिरले. त्यामुळे नागरिकांचे प्रचंड झाले. रामराज-बोरघर या गावाला जोडणाऱ्या पुलावरून पाणी वाहत होते. रोहावरून अलिबागकडे येणाऱ्या जाणाऱ्या बस सेवा फक्त बोरघर फाट्यापर्यंत सोडण्यात आल्या. अनेक गावांचा संपर्क तुटला होता. शाळा, महाविद्यालयात गेलेल्या विद्यार्थी, नागरिक, महिला पुलाच्या अलिकडे अडकली होती. रामराज येथील सोहम वागळे यांच्यासह काही तरुणांनी पुढाकार घेत अडकलेल्या विद्यार्थ्यांसह नागरिक, महिलांना सुखरूप त्यांच्या निश्चित स्थळी सोडले.

**धरणांमध्ये ९१ टक्के जलसाठा**

कोलाड येथील लघु पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या रायगड जिल्ह्यातील २८ धरणांमध्ये ९१टक्के जलसाठा आहे. २८ धरणांपैकी २२ धरणांमध्ये शंभर टक्के जलसाठा आहे. उर्वरित अलिबाग तालुक्यातील श्रीगाव, श्रीवर्धन तालुक्यातील रानीवली या दोन धरणांमध्ये ५० टक्के, श्रीवर्धनमधील कार्ले, उरणधील पुनाडे या दोन धरणांमध्ये ७५ टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी, कर्जत येथील साळोख धरणांमध्ये ९९ टक्के जलसाठा असल्याची माहिती लघू पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली आहे.

**सहा तालुक्यातील शाळांना सुट्टी**

जिल्ह्यातील जिल्ह्यातील माणगाव, तळा, रोहा, सुधागड, (पाली) व पोलादपूर या तालुक्यातील सर्व माध्यमाच्या शाळा व महाविद्यालय यांना मंगळवारी (दि.१५) सुट्टी जाहीर करण्यात आली. या तालुक्यातील अंगणवाडी सरकारी व खासगी प्राथमिक, माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा नगरपालिका शाळा अनुदानित व विनाअनुदानित शाळा सर्व आश्रम शाळा महाविद्यालय आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षक केंद्र अशा अनेक शैक्षणिक संस्था यांना सुट्टी जाहीर केली असल्याचे आदेश रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी काढले.

## उरणमध्ये वाढती नशेखोरी

कफ सिरप इथवर पोहोचली आहे. यामुळे शाळा-कॉलेजांकडे पाठ फिरवलेली मुलं दिवसाढवळ्या नशेच्या दुनियेत रमलेली दिसतात. सर्वात गंभीर बाब म्हणजे, हे सगळं पालकांना माहीत असूनही ते बदनामीच्या भीतीनं तोंड उघडायला तयार नाहीत. पोलीसही गप्प बसले आहेत, असे बोलले जात आहे.

पोलीस प्रशासनाने आता तरी झोपेचं सोंग सोडावं, या अड्ड्यांवर छापे टाकावेत, ड्रग्ज विकणाऱ्या टोळ्यांचा बंदोबस्त करावा आणि शाळा-कोलेजांमध्ये व्यसनमुक्ती मोहीम सुरू करावी. नाहीतर एक दिवस हीच मुले समाजाचा चेहरा काळवंडवतील, असे सुज्ञ उरणकरांकडून सांगण्यात येत आहे.

उरणमध्ये सोनू, पटेल, शहा नावाचे मोठे दलाल उरणमध्ये कार्यरत आहेत. तसेच तालुक्यातील व शहरातील बहुतांश पान टपरीवर नशीली पदार्थांची खुलेआमपणे विक्री केली जात आहे. याची माहिती शासकीय यंत्रणेला नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## सारा नर्सिंग महाविद्यालयाची परवानगी तात्काळ रद्द करा

महाविद्यालयातील अद्ययावत सोयी-सुविधा, ग्रंथालय, वसतिगृह व अद्ययावत इमारतीबाबत शंका व्यक्त केली. त्यामुळे या महाविद्यालयाची परवानगी रद्द करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी अधिवेशनात केली.

या प्रश्नावर उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी यांनी सांगितले की, जातीवाचक बोलण्याप्रकरणी विद्यार्थ्याला वाईट वाटल्याने त्याने आत्महत्या केली. याबाबत विद्यार्थ्याच्या पालकांनी सारा नर्सिंग महाविद्यालयाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सदर संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याची नोंद १० जूनला करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील आरोपीचा शोध तपास पथकांमार्फत करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास अजून सुरू आहे, न्याय देण्यासाठी कटिबद्ध असून, त्यापद्धतीने कारवाई केली जात आहे. सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करू, असे आश्वासन योगेश कदम यांनी दिले. मात्र, महाविद्यालयाची परवानगी गृहविभागाच्या अखत्यारितला विषय नाही. मात्र, संबंधित विभागाकडून माहिती घेतली जाईल. महाविद्यालयाची सर्व कागदपत्रे तपासली जातील. चुकीची कागदपत्रे आढळल्यास कारवाई केली जाईल, असेही आश्वासन कदम यांनी दिले.

**सिडको** शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**
**(अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ७)**
**(देवद (भाग), विचुंबे, (भाग), उसर्लीखुर्द (भाग), शिवकर (भाग),कोळखे (भाग)**
**(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्रमांक १३(९) अन्वये)**

शासनाच्या नगर विकास विभागाने निम्न स्वाक्षरीकार यांची अधिसूचना क्र. टीपीएस-१२२२/२१५२/प्र.क्र.१४८/२२/नवि-१२, दिनांक २ डिसेंबर २०२२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(१) अन्वये लवाद म्हणून मंजूर प्रारुप नैना नगर रचना परियोजना क्र. ६ साठी नियुक्ती केलेली आहे.

त्याप्रमाणे निम्नस्वाक्षरीकार यांनी अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ७ चा निवाडा उक्त अधिनियमांच्या कलम ७२(७) अन्वये तसेच उक्त नियमांच्या नियम क्र. १३(९) प्रमाणे दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी विहीत मुदतीत जाहीर केलेला आहे.

याबाबतची सूचना दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-२ व ०१.१०.२०२४ रोजीच्या वृत्तपत्र दैनिक न्यूजबॅण्ड मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच योजनेचा अहवाल, फॉर्म, क्र. १ व २, व योजनेचे नकाशे हे सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम नगर रचना परियोजना प्रामुख्याने भूखंडांचे मूल्य, अंशदान, खर्चाचा अंदाज इत्यादी स्वरुपाची आहे. त्यानुसार प्रत्येक जमीन मालकाला विहीत नमुना क्रमांक ५ मध्ये त्याच्या अंतिम भूखंडाचे मूल्य तसेच अंशदान इत्यादींचा तपशील उक्त् नियमांच्या नियम क्र.१३(९) प्रमाणे पोस्टामार्फत पाठविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम च्या कलम ७३ अन्वये कलम ७२, पोट कलम ६ चे खंड १,२,४, ५ आणि खंड ७ ते १३ या मधून उदभवणाऱ्या बाबींखेरीज इतर बाबतीत लवादांचा प्रत्येक निर्णय हा अंतिम व निर्णायक राहील आणि नियोजन प्राधिकरणासह सर्व पक्षांना तो बंधनकारक राहील अशी तरतुद आहे. तसेच कलम ७४ अन्वये कलम ७२ चे पोट कलम ६ खंड चे १,२,४, ५ आणि खंड ७ ते १३ अन्वये लवादाने दिलेले कोणतेही निर्णय नियोजन प्राधिकरणासह संबधीत पक्षांना कळविण्यात येतील आणि अश्या निर्णयामुळे स्वत:वर अन्याय झाला आहे असे वाटणाऱ्या कोणत्याही पक्षास अपिल न्यायाधिकरणाकडे ही बाब अपीलावरील निर्णयाकरीता पाठविण्यासाठी लवादाकडे अर्ज करता येईल अशी तरतूद आहे.

**असे आढळून आले आहे की, काही अंतिम भूखंडांच्या जमीन मालकांना अदयाप अशा नोटीसा मिळालेल्या नाहीत, या संदर्भात निम्न स्वाक्षरीकार ही जाहीर नोटीस देत आहेत की, अंतिम भूखंडांच्या ज्या जमीन मालकांना अशा नमुना क्र.५ मधील नोटीसा मिळालेल्या नाहीत त्या त्यांनी लवादांच्या कार्यालयात तात्काळ येवून घेवून जाव्यात.**

**या नुसार जमीन मालकांना असेही कळविण्यात येत आहे की, वर नमूद अधिनियमाचे तरतुद नुसार जर अंतिम भूखंडाचे जमिन मूल्य, अंशदान बाबत त्यांना अपील करावयाचे असेल तर ही जाहीर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या कालावधीत निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी दाखल करावे.**

(अभिराज गिरकर)
लवाद
रचना परियोजना क्र.७ (नैना)

**दिनांक - जुलै २०२५**
**पत्ता- नैना कार्यालय , टॉवर नं. १०,**
**आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन,**
**सिबीडी- बेलापूर- नवी मुंबई-४०० ६१४**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१६४/२०२५-२६

# ई-रिक्षा चालकांची तारेवरची कसरत

## माथेरानमध्ये रस्त्यांची दुर्दशा; प्रशासनाचे दुर्लक्ष

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमध्ये येण्यासाठी नेरळमार्गे-माथेरान या घटमार्गाशिवाय अन्य पर्यायी व्यवस्था उपलब्ध नाही. तसेच, मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरीपासून गावात चालत जावे लागते. पर्याय म्हणून हातरिक्षा किंवा घोड्याची रपेट करत जाता येते. तसेच, पर्यटन वाढीच्या दृष्टीने आणि आपत्कालासाठी अल्प प्रमाणात ई-रिक्षांची सुविधा उपलब्ध करण्यात आली. त्यामुळे पावसाळ्यात याठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी पाहायला मिळत आहे. परंतु, अल्प प्रमाणात उपलब्ध असलेल्या ई-रिक्षांमुळे पर्यटकांसह स्थानिकांना तिची तासनतास वाट पाहण्याची नामुष्की ओढावत आहे. त्यातच येथील रस्त्यांच्या दयनिय अवस्थेमुळे ई-रिक्षा चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

सध्या पावसाचे दिवस असल्याने माथेरानमधील निसर्ग फुलले असून पर्यटकांची नियमितपणे एकप्रकारची जत्रा भरलेली दिसते. वेळप्रसंगी राहायला खोल्या सुद्धा उपलब्ध होत नाहीत, एवढ्या मोठ्या प्रमाणात पर्यटक ई-रिक्षा सुरू झाल्यापासूनच गर्दी करताना दिसत आहेत. त्यामुळे येथील सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. मात्र, ई-रिक्षांची अपूरी पडणाऱ्या सेवेमुळे सर्वांचाचा हिरमोड होत आहे. माथेरानमध्ये सध्या वीस ई-रिक्षा कार्यरत आहेत. परंतु, त्यातील पंधरा ई-रिक्षा या येथील शालेय विद्यार्थ्यांना नियमीतपणे ने-आण करत असतात. त्यामुळे उर्वरित पाच रिक्षांवर पर्यटकांसह स्थानिक नागरिकांच्या प्रवासाचा भार येतो. वेळावेळी अधीक ई-रिक्षांची मागणी करून देखील ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करण्यात येत नाही. त्यातच येथील रस्त्यांची रस्त्यांची अवस्था खूपच दयनीय बनलेली आहे. त्यामुळे ई-रिक्षा चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.



याच नादुरूस्त रस्त्यावरून संबंधित अधिकारी रोज ये-जा करती असतात. परंतु, तरीदेखील ते पर्यटकांसह स्थानिकांच्या जीवाशी खेळ खेळत असल्याचे त्यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत. अशीच परीस्थिती कायम राहिल्यास एखादा भीषण अपघात झाल्याशिवाय राहणार नाही. तसेच, खराब रस्त्यांमुळे ई-रिक्षांना सतात दुरुस्तीसाठी नेरळ अथवा पनवेल याठिकाणी न्यावे लागत आहे. त्या ने-आण करण्यात आणि दुरूस्तीसाठी प्रचंड प्रमाणात आर्थिक भुर्दंड बसत आहे. त्यामुळे प्रवाशांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागते.

> देशातील अनेक ठिकाणी भेटी दिल्या आहेत. भले त्याठिकाणी मोटार गाड्या धावतात. त्या तुलनेत माथेरान हे एक अतिशय सुंदर ठिकाण असून प्रदूषण मुक्त स्थळ आहे. परंतु, येथील रस्त्यांची व्यवस्था उत्तम प्रकारे असणे आवश्यक आहे. ई-रिक्षातून येत असताना खूपच खड्डेमय रस्त्यातून प्रवास करताना त्रासदायक ठरत आहे.
> – सिद्धेश्वर पटनाईक, पर्यटक, मुंबई

> दस्तुरी जवळील काळोखी या तीव्र चढावाच्या भागात रस्ता खूपच खडतर बनलेला असून अधिकारी वर्ग नियमित याच ई-रिक्षातून प्रवास करतात. त्यांनी प्रामुख्याने या खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती करून घेणे गरजेचे आहे. रिक्षा, पर्यटक, घोडे आणि पादचाऱ्यांची याच अरुंद रस्त्यावरून सातत्याने रहदारी सुरू असते. लवकरच हा रस्ता चांगल्या पद्धतीने बनविला नाही, तर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
> – संतोष लखन, माजी नगरसेवक



# आंबेवाडी नाक्यात शिरले पाणी

। कोलाड । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यात सोमवारपासून सुरू झालेला मुसळधार पाऊस मंगळवार दि.१५ जुलै रोजी दुपारपर्यंत पडतच होता. त्या पावसाचा फटका सर्वत्र बसत असुन जनजीवन विस्कळीत झाले होते. कोलाडमधील डोंगर नदी-नाले तुडुंब भरल्याने आंबेवाडी नाका, कालवा परिसर, महामार्ग सर्व्हिस रोड, रोहा-कोलाड रस्ता व गोवे रस्त्यावर प्रचंड प्रमाणात पाणी साचले होते. तर, अनेकांच्या घरात व दुकानांत पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. त्याचा मोठा फटका येथील व्यावायीकांसह नागरीकांना बसला. दरम्यान, मंगळवारी माणगांव, रोहा, तळा, पाली, महाड व पोलादपूर या तालुक्यातील सर्व माध्यमाच्या शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहिर करण्यात आली होती.



# नागोठण्यात रात्रीपासून पावसाचा कहर

। नागोठणे । वार्ताहर ।

सोमवार रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे दुथडी भरून वाहणाऱ्या नागोठण्यातील अंबा नदीने मंगळवारी (दि.१५) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास धोक्याची पातळी ओलांडली. त्यानंतर थोड्याच वेळात अंबा नदीचे पाणी नागोठणे एस.टी.स्थानक, बाजारपेठ, आठवडा बाजार, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कोळीवाडा, मरिआई मंदिरा समोरील मुख्य रस्ता, लेकव्ह्यू हॉटेल समोरील रस्ता, मोहल्याचा काही भाग यांसह इतर सखल परिसरात आले. त्यामुळे पूर आलेल्या भागातील नागरिकांनी आपल्या घरातील व दुकानदारांनी आपल्या दुकानातील सामानाची तातडीने हलवाहालव केली. येथील विशाल मेडिकल समोर असलेल्या मिनिडोर रिक्षा स्टँडच्या परिसरात तसेच नागोठणे एस.टी.बस स्थानकासामोरील परिसरात पूराचे पाणी आल्याने याचा वाहतूकीवर परिणाम झाला. नागोठणे परिसरातून शिक्षणासाठी नागोठणे येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांची यावेळी घरी जाण्यासाठी तारांबळ उडाल्याचे दिसून आले. पुरामुळे एसटी स्थानकात येणाऱ्या गाड्यांना नागोठणे येथील मुंबई-गोवा महामार्गावर थांबविण्यात आले होते.

# सेन्ट जोसेफ शाळेजवळ चिखलाचे साम्राज्य



। पातागंगा । प्रतिनिधी ।

लोधिवली जवळ असलेल्या सेन्ट जोसेफ शाळे जवळ पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत असून वहानांच्या लांबच लांब रांगा या ठिकाणी पहायला मिळत आहेत. तसेच, अनेक विद्यार्थ्यांना पायी पिट करत शाळेपर्यंत चालत जावे लागत आहे. त्यातच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल असल्यामुळे पाय घसरुन विद्यार्थी पडत असून शैक्षणिक साहित्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे विद्यार्थी वर्गातून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. हा रस्ता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या अंतर्गत येत असून, या ठिकाणी दिवस भरातून अनेक वाहने या चिखलात अडकून सातत्याने अपघात घडत असल्यांचे देखील निदर्शनास येत आहे. मात्र, तरीदेखील याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप विद्यार्थी व्यक्त करीत आहे.

# रोहा- नागोठणे मार्गावर दरड कोसळली

। सुकेळी । वर्ताहर ।



संपुर्ण रायगड जिल्ह्याला अक्षरशः मुसळधार पावसाचा फटका बसला आहे. याचाच फटका रोहा-नागोठणे मार्गावरील भिसे खिंडीतून होणाऱ्या वाहतुकीला बसला. भिसे खिंडीत मंगळवारी (दि.१५) सकाळच्या सुमारास रस्त्यावरती मोठी दरड कोसळली. त्यामुळे रोहा-नागोठणे मार्गावरील वाहतूक काही काळासाठी बंद झाली होती. प्रशासन यंत्रणेद्वारे तात्काळ दरड हटविण्याचे काम सुरू करण्यात आले. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.

भिसे खिंडीत नागोठणे बाजूकडील उतारावर तीन ठिकाणी झाडे पडून मातीही मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आली होती. या घटनेची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम खात्याचे अभियंता एम.एम. घाडगे, बांधकाम खात्याचे कर्मचारी व सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन कुलकर्णी व पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सार्वजनिक बांधकाम खात्याकडून जेसीबी यंत्राच्या सहाय्याने रस्त्यावर पडलेली झाडे व दरड चार तासांच्या अथक प्रयत्नानंतर बाजूला करण्यात आली. त्यानंतर दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास नागोठणे-रोहा मार्ग वाहतुकीसाठी पूर्ववत झाला.

दरम्यान, वनखात्याच्या अडथळ्यामुळे पडायला आलेली झाडे उन्हाळ्यात तोडण्यात येत नसल्याने पावसाळ्यात ही झाडे उन्मळून पडत आहेत. त्याचा नाहक त्रास वाहनचालक व नागरिकांना होतो. त्यामुळे एखादा मोठा अपघात घडण्यापूर्वी वनखाते व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सामंजस्याने यावर तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

# बेणसेतील मुख्य रहदारीचा मार्ग पाण्यात



। पाली/बेणसे । वार्ताहर ।

मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक गावांना पुराच्या पाण्याने वेढा दिल्याने सर्वत्रच जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. पेण तालुक्यातील बेणसे गावाला देखील मुसळधार पावसाचा फटका बसला आहे. बेणसे गावाच्या प्रवेशद्वाराकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. त्यामुळे बेणसे गावाकडे जाणारा रहदारीचा मुख्य मार्ग वेगवान प्रवाहाच्या पाण्यामुळे बंद झाल्याने गावकरी, विद्यार्थी व कामगार वर्गाचे प्रचंड हाल होत आहेत. दरवर्षी पावसाळ्यात हा मार्ग बंद होत असल्याने यावर ठोस उपाय काढण्यात यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

येथील स्थानिक ग्रामस्थ संदीप कुथे म्हणाले की, दरवर्षी पावसाळ्यात बेणसे गावाकडे जाणाऱ्या येणाऱ्या मार्गावर वेगवान प्रवाहाच्या लोटाने रहदारी व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. पादचाऱ्यांना देखील या पाण्यातून रस्ता काढणे कठीण होते. ही परिस्थिती दरवर्षी येत असते. मात्र, यावर ठोस उपाय केला जात नसल्याने याचा फटका विद्यार्थी, ग्रामस्थ व कामगार वर्गाला बसतो. लवकरात लवकर या मार्गालगत साचणार्या पाण्याचा प्रवाह मोकळा करून कायमस्वरूपी रहदारी व्हावी. अशी उपाययोजना ग्रामपंचायत व रिलायन्स व्यवस्थापन यांनी पुढाकार घेऊन करावी, अशी मागणी जनतेतून जोर धरत असल्याचे कुथे यांनी सांगितले.

# वाकण रस्त्यावर पाण्याचे साम्राज्य

। पाली /वाघोशी । वार्ताहर ।

पाली, खोपोली, वाकण या रस्त्यासाठी शासनाने करोडो रुपये खर्च करून काँक्रिटीकरण केले. जेणेकरून या रस्त्यावरचा प्रवास सोयीचा होईल. मात्र, पावसाळ्यात या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. आणि त्यामुळे अपघाताचे प्रमाण देखील वाढते. मागील वर्षी घोड्याचा डोह या रस्त्यावर पाणी साचल्याने चारचाकी व दुचाकीचा भीषण अपघात होऊन पती-पत्नीचा जीव गेला होता. यावर्षी देखील तशीच परिस्थिती सर्वत्र निर्माण झाली आहे. हा रस्ता बनविताना एमएसआरडीसीने रस्त्यावर पाणी साचणार नाही याकरिता कुठलेही तांत्रिक काम केले नाही. पर्यायी शासनाच्या करोडो रुपयाचा एमएसआरडीसी यांनी चुरडा केल्याचे दिसत आहे. पाली, खोपोली, वाकण या रस्त्यावर अनेक प्रवासी मुंबई अथवा गोवा करता पर्यायी मार्ग म्हणून प्रवास करीत असतात. मात्र, एमएसआरडिसीच्या ढिसाळ कारभारामुळे लोकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

# म्हसळ्यात अतिवृष्टीने जनजीवन विस्कळीत



। म्हसळा । वार्ताहर ।

जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे म्हसळा तालुक्यातील अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत होण्याच्या घटना घडल्या आहेत. म्हसळ्यावरून माणगावकडे जातातना ढोरजे गावातील पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. तसेच, काही ठिकाणी डोंगरावरची माती रस्त्यावर आली होती. त्यामुळे काहीकाळ याठिकाणी वाहतुकीसाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या.

म्हसळा तालुक्यातील ढोरजे पुलाची समस्या गेली अनेक वर्षांपासून नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. या बाबतच्या तक्रारी परिसरातील नागरिकांनी वारंवार प्रशासनाकडे केल्या असून आजपर्यंत या पुलाच्या नूतनीकरणाकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. तसेच, कुडतूडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठे झाड कोसळून दरड कोसळली होती. त्यामुळे परिसरातील आठ ते दहा गावांचा तालुक्याशी संपर्क तुटला होता. त्याचप्रमाणे हिंगुळडोह तुडुंब भरल्याने पाणी रस्त्याच्या दिशेने घुसले होते. जानसई नदी दुतर्फा ओसंडून वाहत असल्यामुळे नदीचे पाणी शहरात घुसल्याने म्हसळा-दिघीकडे जाणारा रस्ता बंद झाला होता. आपत्कालीन टीम सतर्क असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. त्यामुळे यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

# मोरी साफ नसल्याने पाणी घरांत

। कोलाड । वार्ताहर ।



मुंबई-गोवा महामार्गावर खांब हद्दीत पडलेले खड्डे व धीम्या गतीने सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाचा फटका येथील रहिवाशांना बसत आहे. तसेच, महामार्गावरील मोरी साफ नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर तुंबल्याने ते परिसरातील घरात व दुकानात शिरले. त्यामुळे अनेकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

या महामार्गावरील मोरी साफ करावी, अशी मागणी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्यावतीने सबंधित प्रशासनाला करण्यात आली होती; परंतु, येथील काम करणाऱ्या संबंधित विभागाने याची वेळीच दखल न घेतल्याने याचा फटका आम्हाला तसेच परिसराला बसला आहे. तरी वेळीच प्रशासनाने लक्ष देऊन येथील मोरी लवकरात लवकर साफ करावी, अशी मागणी सरपंच मनोज शिर्के यांनी केली आहे.

# पोलादपूरमध्ये पावसाची दीड हजारी नोंद



। पोलादपूर । प्रतिनिधी ।

महाबळेश्वर गिरिस्थान आणि पोलादपूर तालुक्याच्या सह्याद्री डोंगररांगांमध्ये सोमवारी रात्री पडलेल्या मुसळधार पावामुळे मंगळवारी पहाटेपर्यंत तब्बल १०५ मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद तहसील कार्यालयातील आपत्ती निवारण कक्षातून देण्यात आली. तालुक्यातील पावसाची एकूण गोळाबेरीज १ हजार ५७१ मिमी झाली असल्याने यंदा १५ जुलैच्या आतच दीड हजारी नोंद पार केली आहे. दरम्यान, पळचिल पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या रस्त्यावर दरड कोसळल्याने रत्नागिरी हद्दीतील दरीकडे धबधब्याचे रूप आले आहे. महाबळेश्वर आणि पोलादपूरच्या जोरदार पावसामुळे तसेच हवामान खात्याच्या रेड अलर्टमुळे रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पोलादपूर, महाड, माणगाव, तळा, रोहा व पाली तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर केली होती.

पीएनपी कलाविकास मंडळातर्फे आयोजन | एकपात्री अभिनय स्पर्धा उत्साहात पार

# प्रभाकरंडकातून कलाकारांना हक्काचं व्यासपीठ

। अलिबाग । प्रतिपिधी ।

शेकाप सरचिटिणीस जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्थानिक ग्रामीण भागातील कलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी पीएनपी कलाविकास मंडळ अलिबाग अंतर्गत ग्रामीण रंगभूमीतर्फे रविवारी (दि.१३) ‘प्रभाकरंडक २०२५’ एकपात्री अभिनय स्पर्धा पीएनपी नाट्यगृहात पार पडली. या स्पर्धा पीएनपी कलाविकास मंडळाच्या अध्यक्ष चित्रलेखा पाटील व चित्रपट दिग्दर्शक तथा संगीतकार विक्रांत वार्डे यांच्या प्रेरणेतून ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ यांच्या मार्गदर्शनाने आयोजित करण्यात आली. ही स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली.



या स्पर्धेत बालगटात दुर्वा झावरे हीने प्रथम क्रमांक पटकावला. तर, मोठ्या गटात श्रुती नाईक प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली.

या स्पर्धेचे उद्घाटन नागेश कुलकर्णी आणि रमेश धनावडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला अलिबागमधील नाट्यक्षेत्रातील नामवंत कलाकार उपस्थित होते. या स्पर्धेत ग्रामीण भागातील एकूण ४८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे परिक्षण प्रदीप गोगटे आणि नरेंद्र ठाकूर यांनी केले. सुत्रसंचालन देवेंद्र केळूसकर आणि जितेंद्र पाटील यांनी केले. तर, प्रास्ताविक सागर नार्वेकर यांनी केले. विक्रांत वार्डे यांनी स्पर्धकांना आणि उपस्थितांना आपल्या भाषणात ग्रामीण रंगभूमीच्या आगामी उपक्रमंची माहीती दिली. कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात ग्रामीण रंगंभूमीचे सचिव प्रतिक पानकर यांनी स्पर्धेचा निकाल जाहीर केला. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ग्रामीण रंगभूमीचे पदाधिकारी राजेंद्र झावरे, संकल्प केळकर, सागर नार्वेकर, अश्रीता बारसे, संचित पानसरे, तन्वी पाटील, मयुर मोरे, तुषार पाटील, ऋषीकेश पडवळ, यश पाटील व नितेश पाटील यांनी खुप मेहनत घेतली.

ही स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली. या स्पर्धेत बालगटात प्रथम क्रमांक दुर्वा झावरे, द्वितीय क्रमांक आराध्य पाटील, तृतीय क्रमांक अनन्या प्रभाळे, तर उत्तेजनार्थ बक्षीस नव्व्या वर्तक व अंश ठाकूर यांनी पटकावले आहे. तसेच, मोठ्या गटात प्रथम क्रमांक श्रुती नाईक, द्वितीय क्रमांक अभिषेक पाटील, तृतीय क्रमांक मनाली इंगळे, तर उत्तेजनार्थ बक्षीस चेतन पाटील, सायली पाटील व कृतिका पाटील यांनी पटकावले आहे. विजेत्यांना चित्रलेखा पाटील व शेकापचे मान्यवर पदाधिकारी यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी, पीएनपी नाट्यगृहात ग्रामीण नाट्य मंडळाचा भव्यदिव्य असा ‘प्रभाकरंडक’ नाट्य महोत्सव घेणार असल्याचे जाहीर केले आहे.

# सारळच्या तरुणांची नदीला परिक्रमा

। रायगड । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील सारळ येथील तरूणाई गेली दोन वर्ष नित्य नियमाने स्थानिक नदीची परिक्रमा करत आहेत. अध्यात्म व सामाजिक गरज या दोन्हीचा समन्वय साधत चालू केलेली नदीची परिक्रमा यावर्षी पावसाळ्यात करत एक नवीन पर्यटनचा पायंडा सुरू केला आहे. समुद्रसंगम ते उगम आणि उगम ते समुद्रसंगम अशी सरला नदीची परिक्रमेचा हा रस्ता निसर्गाच्या सानिध्यात रमणारा आहे. दरवर्षी हा कार्यक्रम मे महिन्यात असतो. यंदा मात्र तो पावसाळ्यात केल्याने निसर्गाचे अनोखे दर्शन यावेळी परिक्रमावाशीयांना झाले.



सारळ येथील सरला नदीची ही तिसरी प्रदक्षिणा आहे. सद्यस्थितित चिखल, दंगडधोंडे, झाडेझुडपे, यातून हा मार्ग जात ही प्रदक्षिणा होते. काही ठिकाणी काठ योग्य नसतील तिथे नदीच्या बाजूने पाऊल वाटेने जावे लागते. सारळघोळ येथून उगम पावणारी ही नदी कनकेश्वरडोंगर, नदीच्या काठावर असणारी देव देवतांची विविध मंदिरे तसेच म्हात्रोळी, मळा, सारळ, या तीन गांववस्ती ठिकाणाला स्पर्श करून जोते. ही नदी सारळपूल इथे समुद्रात संगम होऊन विसर्जित होते. समुद्रसंगम ते उगम व उगम ते समुद्रसंगम असा प्रवास केल्यास ही प्रदक्षिणा पूर्ण होते. नदीच्या तिन्ही प्रदक्षिणेत मुख जीवन रक्षक म्हणून कार्य केलेले नीलेश राणे यांचे विशेष कौतुक परिसरातून होत आहे.

# वारसा आणि जबाबदारी

राज्यातील अकरा किल्ल्यांना युनेस्कोने वारसा स्थळे म्हणून मान्यता दिली आहे. शिवाजीमहाराज हा मराठी जनतेचा मानबिंदू. त्या राजाच्या इतिहासाशी संबंधित असे हे सर्व किल्ले आहेत. साहजिकच अखिल महाराष्ट्रासाठी ही आनंदाची बातमी आहे. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर यांच्यासोबतच सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि सिंधुदुर्ग या जलदुर्गांचाही त्यात समावेश आहे. याखेरीज उत्तर मराठेशाहीत महत्वाचा ठरलेल्या तमिळनाडूतील जिंजीच्या किल्ल्यालाही वारसा स्थळ म्हणून मान्यता मिळाली आहे. युनेस्को ही संयुक्त राष्ट्रसंघाची सांस्कृतिक संघटना आहे. त्यामुळे मराठी माणसाच्या या अभिमानास्पद वारशावर आता जागतिक मान्यतेची मोहोर उमटली आहे. भारतात युनेस्कोने मान्यता दिलेली २९ वारसास्थळे आहेत. त्यात महाराष्ट्रातील अजिंठा व वेरुळची लेणी, एलिफंटाची लेणी तसेच बोरीबंदरचे छत्रपती शिवाजीमहाराज रेल्वे स्थानक अर्थात सीएसटी यांचा समावेश आहे. युनेस्कोच्या या यादीमध्ये भारतभरातील बहुतांश मंदिरे जसे की महाबलिपुरम, कोनार्क किंवा खजुराहो तसेच ताजमहाल, कुतुबमिनार यासारखी मुगलकालीन वास्तू, सुंदरबन, नंदादेवीसारखी जंगले इत्यादींचा समावेश आहे. पण हिंदुस्थानच्या लखलखत्या इतिहासातील एक सुवर्णपान असलेल्या मराठ्यांच्या इतिहासातील बारा किल्ल्यांचा एकाच वेळी या यादीत समावेश होणे हे ऐतिहासिक बाब आहे. यामुळे शिवाजीराजांचा इतिहास व मराठा सैनिकांचे शौर्य यांची जागतिक पातळीवर नोंद घेतली जाणार असून त्यांचा अधिक अभ्यास होण्याला मदत मिळणार आहे. यामुळे या स्थळांची देखभाल, सौंदर्यीकरण इत्यादीसाठी पैसे तर मिळतीलच. शिवाय जागतिक तज्ज्ञांची मदतही मिळेल. शिवाय, या ठिकाणी येणाऱ्या जागतिक पर्यटकांचा ओघही वाढेल. कारण, युनेस्कोची मान्यता म्हणजे अनेक प्रकारच्या कसोट्या त्या स्थळाने पास केलेल्या असणार ही हमी असते. भारतात येणाऱ्या परदेशी पर्यटकांची सर्वाधिक पसंती ताजमहालला असते. ते साहजिकही आहे. ताजमहाल हा दृष्टीला अत्यंत सुखावणारा व तो कसा बांधला असेल याचे आश्चर्य करायला लावणारा आहे. आता आपले शिवकालीन किल्ले त्या ताजमहालाच्या जोडीने जाऊन बसणार आहेत. अर्थात वारसास्थळ म्हणून मान्यता मिळाली तरी पुढची आपली जबाबदारी अधिक वाढली आहे.

## अवशेषांची वाताहात

हे किल्ले म्हणजे आपल्या इतिहासाचा वैभवशाली वारसा असले तरी प्रत्यक्षात या किल्ल्यांच्या नावाने जे काही उभे आहे त्यात फारसे वैभवी, देखणे असे काहीच नाही. त्यातून अस्सल भारतीय अनास्थेपायी आपण त्यांची दुरवस्था केली आहे. आपल्या पर्यटक बांधव आणि भगिनींनी तेथील दगडांवर कोरून ठेवलेली नावे, जागोजाग फेकलेला कचरा, तेथील स्मारक ठरतील अशा वस्तू, जसे की तोफा, विटा, इत्यादींच्या केलेल्या चोऱ्या यांनी हे सर्वच किल्ले कमीअधिक त्रस्त आहेत. या किल्ल्यांवर जाण्यासाठी चांगले रस्ते नाहीत. माहिती देणारे फलक कमी आहेत. मराठी असल्यामुळे आपण लहानपणापासून शिवाजीराजांचा इतिहास वाचत आलेलो आहोत व आपण या किल्ल्यांवर भक्तिभावाने जातो. तेथे कल्पनेनेच काही गोष्टी डोळ्यासमोर आणतो व त्या इतिहासाला नमन करून परत येतो. पण अशा वारसा स्थळांवर आपल्याला समृध्द अनुभव मिळाला असे क्वचितच घडते. रायगडचे उदाहरण घ्या. स्वराज्याची ही राजधानी. तेथे राजांचा दरबार कसा भरत असेल, त्यांचे महाल कसे असतील याचे दृश्य आपल्यासमोर तेथे उभे राहत नाही. कारण, बहुतांश अवशेषांची पडझड झाली आहे. पण ग्रीसमध्ये अशाच किंवा याहून अधिक पडझड झालेल्या अवशेषांमधून अत्यंत प्राचीन इतिहास उभा करण्याचे कौशल्य व ती आस्था तेथील जनतेने दाखवली आहे. आपल्याकडे तिचा अभाव आहे. त्यावर मात करावी लागेल. रायगडवर जाण्यासाठी रोपवे करण्यात आला आहे. पण महाडपासून तेथे जाणारा रस्ता फार चांगला नाही. इतर किल्ल्यांची स्थिती तर याहूनही वाईट आहे. सिंधुदुर्ग किल्ल्याचा केवळ बाहेरचा बुरुज शिल्लक आहे. राजगड हा इतका बुलंद किल्ला. पण तेथेही वर दाखवण्यासारखे असे काहीच नाही. बहुतांश ठिकाणी केवळ कोण्या देवीदेवतांची मंदिरे शिल्लक आहेत. लोकांची श्रध्दा व त्यातून पुजाऱ्यांना काही पैसे मिळण्याची शक्यता यामुळेच बहुदा ती टिकून असावीत. बाकी, किल्ल्यांमधील ऐतिहासिक अवशेषांची वाताहात झाली आहे. दुर्दैवाने त्यांचे जतन करावे ही वृत्तीच आपल्या समाजात नाही.

## खोटा अभिमान पुरे

नुकतीच संभाजी ब्रिगेडच्या प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक झाली व त्यांना मारहाण करण्यात आली. ब्रिगेडच्या नावात संभाजीराजांचा उल्लेख एकेरी असल्याबद्दल ही शाईफेक झाली असे सांगण्यात आले. आपल्या पूर्वीच्या पराक्रमी पुरुषांबद्दल जवळिकीने सामान्य लोक त्यांचा उल्लेख पूर्वापार शिवाजी, संभाजी किंवा बाजीराव असा करीत आले. आता बहुतांश लोक तो आदरार्थीच करतात. गंमत अशी आहे की, असा उल्लेख एकेरी केला म्हणून आपल्यातल्या काही लोकांच्या भावना दुखावल्या जातात, पण शिवाजीराजे किंवा इतर महानुभवांनी घालून दिलेल्या आदर्शांची जी सर्रास मोडतोड चालते तेव्हा मात्र आपण शांत राहतो. मालवणला उभारलेला शिवाजीराजांचा पुतळा काही महिन्यात पडला. त्या पुतळ्याचे कंत्राट कोणी दिले याची चौकशी आपल्याला तडीला न्यावी असे वाटत नाही. ज्या सरकारने हे केले त्यातील लोक त्याबद्दल याचे प्रायश्चित्त घेत नाहीत. दुसरीकडे रयतेच्या शेतातल्या एका कणसाला हात लावू नका असे राजांनी बजावले होते. आता कणीसच काय पूर्ण शेतेच्या शेते बळकावणारेच राज्य करीत आहेत. पण त्यामुळे कोणाच्या भावना दुखावत नाहीत. युनेस्कोने मान्यता दिल्याबद्दल हेच राज्यकर्ते स्वतःची पाठ थोपटून घेतील. पण या किल्ल्यांची दुरवस्था सुधारण्यासाठी यांनी आजवर काहीही केलेले नाही. निव्वळ शिवाजीराजांचे पुतळे किंवा मंदिरे उभारणे इतकीच या सरकारची इतिहास जपण्याबाबतची कल्पना आहे. वास्तविक युनेस्कोच्या या मान्यतेच्या निमित्ताने शिवाजीराजांचे स्वराज्य, त्याचे वेगळेपण, त्यांची राज्यकारभाराची दृष्टी, लष्करी दूरदृष्टी, रयतेबद्दलचा जिव्हाळा इत्यादी गोष्टींचे एकत्रित दर्शन या बारा किल्ल्यांवर मिळून घडवता येऊ शकेल. तशी खास आखणी करता येईल. आजच्या तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन हे दर्शन विविध प्रकारे घडवता येईल. छोटे माहितीपट, चित्र व लेखी माहिती, फोटो, साउंड आणि लाईट शोसारखे उपक्रम अशा गोष्टींचा वापर करता येईल. हे केले तरच तो इतिहास सर्वांगाने समोर आणता येईल. महाराजांप्रमाणे त्यांच्या पराक्रमी शिलेदारांचेही गुणगान करता येईल. शिवाय सुखसोयींची नीट व्यवस्था केली तरच अधिकाधिक संख्येने पर्यटक येथे येतील व हा सर्व खटाटोप कारणी लागेल. अन्यथा, पर्यटक येत नाहीत व खर्च परवडत नाही या सबबीवर हा उपक्रम कालांतराने बंद पडेल. शिवाजीराजांचा इतिहास मराठी लोकांना तोंडपाठ आहे. त्याच्या अभिमानाचे भरपूर राजकारण या प्रदेशात करून झाले आहे. आता युनेस्कोच्या मान्यतेनंतर किमान आपण अधिक समंजसपणा दाखवावा आणि हा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडावी.

## विचार

# मनोमिलनाचा अर्थ

*दोन दशकांनंतर मराठीच्या मुद्यावर उद्धव आणि राज ठाकरे हे दोन भाऊ एकत्र आले असल्याचे दिसत असले, तरी कारण दोघांच्या राजकीय अस्तित्त्वाचा प्रश्न हे खरे कारण आहे. ते एकत्र आल्याने लगेच राजकारणाचे वासे फिरणार नाहीत. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांची पराभूत मानसिकता बदलली, तरी खूप झाले. मराठी मतांच्या एकत्रिकरणाच्या प्रयत्नांमध्ये अन्य मतांचे ध्रुवीकरण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.*

**प्रा. अशोक ढगे**

राज्य सरकारच्या हिंदी सक्तीच्या विरोधात उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आल्याचे सांगितले जात असले, तरी हे तात्कालिक कारण आहे. मागच्या काही वर्षांमध्ये मनसेला कोणत्याही निवडणुकीत फारसे यश मिळत नव्हते, तर शिवसेनेतील फुटीनंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला लोकसभेचा अपवाद वगळता सातत्याने पराभवाचा सामना करावा लागला आहे. राज आणि उद्धव यांच्यात राजकीय वितुष्ट होते, तरी कौटुंबिक सुखदुखात ते कायम एकत्र असायचे. लोकसभेच्या निवडणुकीत जसा राज यांचा भाजपला फार फायदा झाला नाही, तसाच तो राज यांनाही झाला नाही. उलट, लोकसभेसाठी केलेल्या मदतीची परतफेड भाजप विधानसभा निवडणुकीवेळी करेल, अशी त्यांची अपेक्षा होती; परंतु राज यांच्या मुलाचा पराभव करण्यास भाजपने हातभार लावला. भाजपला राज्यात शत-प्रतिशत भाजप करायचा आहे. त्यामुळे मित्रपक्षांना किती मदत करायची, याचे काही सूत्र ठरले आहे. भाजप फायदा करून घेतो आणि नंतर वाऱ्यावर सोडतो, असा राज यांचाही समज झाला. दुसरीकडे, उद्धव यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ऐन वेळी घेतलेल्या भूमिकेमुळे भाजपची सत्ता राज्यात येऊ शकली नाही. त्यामुळे उद्धव यांना धडा शिकवण्याची संधी भाजप शोधत होता. शिवसेनेच्या शिंदे गटाने ही संधी दिली. शिवसेनेत प्रथमच एवढी मोठी फूट पडली. उद्धव यांचे मुख्यमंत्रिपद गेले. विधानसभेत नीचांकी जागा मिळाल्या. त्यातच ठाकरे ब्रँड संपवण्याची भाषा केली गेली. त्यातूनच मजबुरी आणि अपरिहार्यतेमुळे दोन भावांना एकत्र यायला भाग पडले, हा एकंदरीत गेल्या दोन महिन्यांमधील घडामोडींचा अर्थ आहे. हिंदी सक्ती हे निमित्त ठरले.

मराठी मतदार हा दोन्ही ठाकरेंच्या पक्षाचा पाया आहे. ते विभागले जात असल्याने दोन्ही पक्षांचे राजकीय अवकाश संपत चालले होते. मित्रपक्षांच्या राजकीय अवकाशाची मदत होत नाही आणि स्वतंत्रपणे राजकीय अवकाश व्यापता येत नाही, ही शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची स्थिती होती. मनसेला तर राजकीय पक्ष म्हणून मान्यता गमावण्याचा धोका आहे. या पार्श्वभूमीवर दोघांनी एकत्र येणे आणि त्यासाठी काही मोठे कारण उभे रहाणे गरजेचे होते. ते हिंदी सक्तीने दिले. मुंबई महापालिकेसह अन्य महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समि त्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज आणि उद्धव एकत्र आले असले, तरी नेत्यांच्या मनोमिलनानंतर तळागाळातील नेत्या, कार्यकर्त्यांपर्यंत मनोमिलनाचा हा झरा झिरपणार का आणि जागावाटप कसे करणार, यावर या दोन्ही पक्षांचे यश अवलंबून असणार आहे. राज आणि उद्धव एकत्र आल्यामुळे मराठी आणि हिंदुत्ववादी मतदार पुन्हा ठाकरे बंधूंकडे आकर्षित होऊ शकतात. यामुळे विशेषतः मुंबई आणि कोकणात शिंदे गटाची ताकद कमी होऊ शकते. भाजपने मराठी मतांचा फायदा घेण्यासाठी शिंदे गटाशी युती केली आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यास भाजपला मराठी मतांचे ध्रुवीकरण रोखण्यासाठी नवी रणनीती आखावी लागेल. यामुळे भाजपची ताकददेखील कमी होऊ शकते. राज यांच्या मनसेची घडी सध्या विस्कटलेली आहे. ती सावरण्याची संधी त्यांना मिळू शकते. म्हणजेच मनसे आणि ठाकरे गटाची युती झाल्यास मनसेला राजकीय वजन वाढण्याची संधी मिळेल.

मध्यंतरीच्या काळात उद्धव ठाकरे महाविकास आघाडीसोबत गेल्याने त्यांच्या हिंदुत्वाच्या मुद्द्यावर विरोधक सातत्याने प्रश्न उपस्थित करतात, तर राज आक्रमक हिंदुत्व आणि मराठीच्या मुद्द्यावर बोलतात. या वैचारिक फरकांचा समन्वय साधणे आव्हानात्मक असेल, मात्र राज आणि उद्धव काय भूमिका घेतात, यावर दोन्ही पक्षांची भविष्यातील वाटचाल अवलंबून आहे. महायुतीतील नेत्यांच्या भेटीनंतर ठाकरे बंधूंच्या युतीला ब्रेक लागल्याची चर्चा होती. मात्र, उद्धव यांनी युतीबाबत स्पष्ट संकेत दिले होते. राज यांनी २००५ मध्ये शिवसेना सोडल्यानंतर बाळासाहेब यांनी दोन्ही भावांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र, ते एकत्र आले नाहीत. कथित हिंदीसक्तीच्या निर्णयाने मात्र दोन्ही भावांना एकत्र आणल्याची कबुली राज यांनी दिली. हिंदी भाषेच्या सक्तीवरून आता महाराष्ट्रातील राजकारण पेटले आहे. मराठीच्या मुद्द्यावरून उद्धव आणि राज हे दोन भाऊ आज एकत्र आले. राज्याच्या राजकारणातील या ऐतिहासिक घटनेची नोंद सर्वच पक्षांनी घेतली. सर्वसामान्य जनतेपासून मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी याची दखल घेतली. वरळीच्या 'एनएससीआय' डोममध्ये झालेल्या विजयी मेळाव्याची दखल फक्त राज्यापुरती मर्यादित नाही, तर दोन ठाकरे बंधूंच्या भेटीची दखल तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनीही घेतली. यावरून या दोन भावांच्या एकत्र येण्याचे महत्त्व लक्षात येते. वाढत्या विरोधामुळे महायुती सरकारला आपला निर्णय मागे घ्यावा लागला. या पार्श्वभूमीवर भाजपचेही या राजकीय हालचालीकडे विशेष लक्ष असल्याचे दिसते.

या पार्श्वभूमीवर आगामी निवडणुका शिवसेना आणि मनसेने एकत्र लढवल्यास राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप होऊ शकतो. दुसरीकडे, उद्धव आणि राज एकत्र येण्याच्या राजकीय घडामोडींवर भाजप बारकाईने लक्ष ठेवून आहे. त्यांनी एकत्र निवडणूक लढवल्यास राज्याच्या राजकारणावर, विशेषत: भाजपवर किती परिणाम होईल, असा प्रश्न उपस्थित होत आहे. राज आणि उद्धव यांनी आपल्यातील सर्व मतभेद विसरून मराठी माणसासाठी एकत्र आल्याचा संदेशही ताज्या मेळाव्यातून दिला. लवकरच होणाऱ्या मुंबई महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. ही निवडणूक 'करा किंवा मरा' स्वरूपाची ठरू शकते. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने चमकदार कामगिरी केली आणि १३२ जागा जिंकल्या. शिवसेनेने (यूबीटी) खूपच खराब कामगिरी करत फक्त २० जागा जिंकल्या. मनसेच्या हाती तर काहीच लागले नाही. उद्धव आणि राज यांना चांगलेच माहिती आहे की महाराष्ट्रातील मुंबई महापालिका निवडणूक ही त्यांच्या पक्षांसाठी अस्तित्वाची लढाई आहे. त्यांना आपला राजकीय पाया मजबूत करायचा असेल, तर एकत्र यावे लागेल. मुंबईत मराठी मतपेढी ३० ते ३५ टक्के आहे. पूर्वी मुंबई आणि आसपासच्या भागात मराठी मते मिळवण्यासाठी भाजप शिवसेनेवर अवलंबून असायचा. शिवसेनेचा ठाकरे गट आणि मनसे यांनी युती करणे हे केवळ एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसाठी आव्हान ठरणार नाही, तर भाजपलाही राजकीय परिणामांनाही सामोरे जावे लागू शकते. भाजप नेत्यांचा विश्वास आहे की मराठी विरुद्ध बिगरमराठी मतदारांचे एकत्रीकरण पक्षासाठी फायदेशीर ठरेल. कारण त्यांना गुजराती आणि उत्तर भारतीयांचा पाठिंबा मिळत आहे आणि ही मतपेढी मुंबईत ३० ते ३५ टक्के आहे. राज यांची मनसे आणि उद्धव यांचा ठाकरे गट हे दोघेही पारंपरिक मराठी मतदारांमध्ये प्रभावशाली आहेत. दोघे एकत्र आल्यास ही मराठी मते फुटणार नाहीत, तर एकसंघ राहतील. ही मते भाजपसाठी अडचणीची ठरू शकतात. या दोघांचा प्रभाव विशेषतः मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे अशा शहरी भागांमध्ये अधिक आहे. या महापालिकांमध्ये मराठी मतदार निर्णायक ठरत असल्यामुळे भाजपला मताधिक्य मिळवण्यात अडथळा येऊ शकतो. भाजपला हे माहीत आहे. मराठी मतांच्या ध्रुवीकरणामुळे अमराठी मतांचे ही ध्रुवीकरण झाल्यास भाजप ही मते आपल्या पदरात पाडून घेईल. गुजराथी, उत्तर भारतीय मतांचे मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील प्रमाण लक्षात घेतले, तर भाजप आता या मतदारांमध्ये आणखी प्रभाव वाढवण्याची शक्यता आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता महाराष्ट्रात उद्धव आणि राज यांच्यापेक्षा शिंदे यांच्या शिवसेनेकडे संख्याबळ जास्त आहे. आमदार, खासदारांची संख्या मोठी आहे. त्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षप्रवेश होत आहेत. त्यामुळे तर ठाकरे बंधूंनीही एकीची वज्रमूठ बांधली. काहीही झाले, तरी मुंबई महापालिका भाजपला जाऊ नये, यासाठी उद्धव प्रयत्नशील आहेत. या युतीचा दोन्ही पक्षांना खरोखरच फायदा होईल का, हेही युती झाल्यास एकदा स्पष्ट होईल.

२०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे एकूण ९९ नगरसेवक होते. मात्र, शिवसेनेतील फुटीनंतर ठाकरे यांच्या शिवसेनेकडे फक्त ५४ नगरसेवक आहेत. मनसेचे सात नगरसेवक निवडून आले होते. मात्र त्यातील एक नगरसेवक शिंदे यांच्या शिवसेनेत तर सहा नगरसेवक ठाकरे यांच्या शिवसेनेत गेल्याने मनसेकडे एकही नगरसेवक नाही. कल्याण डोंबिवली महापालिकेमध्ये शिवसेनेचे ५७ नगरसेवक निवडून आले होते. शिवसेनेतील फुटीनंतर सद्यस्थितीत उद्धव यांच्या शिवसेनेकडे केवळ नऊ नगरसेवक आहेत तर मनसेचे निवडून आलेले नऊ आणि एक अपक्ष मिळून दहा नगरसेवक आहेत. ठाणे महापालिका महापालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे ६७ नगरसेवक निवडून आले होते. शिवसेनेत झालेल्या पक्षफुटीनंतर सद्यस्थितीत ठाकरेंच्या शिवसेनेकडे यापैकी फक्त तीन नगरसेवक आहेत, तर मनसेचा एकही नगरसेवक ठाणे महापालिकेत नाही. नवी मुंबई महापालिकेच्या २०१५ मध्ये झालेल्या निवडणुकीत शिवसेनेचे ३८ नगरसेवक निवडून आले होते. शिवसेनेतील फुटीनंतर ठाकरेंच्या शिवसेनेकडे चार नगरसेवक आहेत, तर मनसेकडे एकही नगरसेवक नाही.

या पार्श्वभूमीवर या चारही महापालिकांमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेला डॅमेज कंट्रोल करत संघटना आणखी मजबूत करून पुन्हा एकदा शिवसेनेची सत्ता आणायची आहे. भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेचे मोठे आव्हान ठाकरे यांच्या शिवसेनेसमोर असणार आहे. त्यामुळे मुंबईसह उपनगरातील प्रमुख महापालिकांवर पुन्हा सत्ता आणायची असल्यास मराठी मतदार एकत्र करण्याची गरज आहे. सद्यस्थितीत मनसेकडे नगरसेवकांचा आकडा बोटांवर मोजण्याइतका असला तरी पक्षाला उभारी देण्यासाठी आणि आपला मतदार टिकवून या महापालिका निवडणुकीत यश मिळवण्यासाठी समविचारी पक्षाला सोबत घेण्याचा विचार या पक्षातर्फे होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर आता दोन्ही बाजू पक्षविस्तार आणि मनोमिलनावर किती यशस्वी ठरतात, हे पहायचे.

## चर्चा आजची

# जिंकता-जिंकता हरलो!

**राकेश लोहार**



भारताने लॉर्ड्सवर जिंकण्याची मोठी संधी गमावली. अवघ्या २२ धावांनी भारताला पराभवाचं तोंड पाहावं लागलं. खरं तर, भारताला इतिहास रचण्याची संधी होती. पण, त्या संधीचं सोनं करण्यात भारतीय संघ अपयशी ठरला. परंतु, आज या मैदानावर भारत हरला असला तरी खेळाडूंनी विशेष करुन रवींद्र जडेजाने आपले अष्टपैलूत्व पुन्हा एकदा सिद्ध केले. भारता विजयाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवल, हेही नसे थोडके! खरं तर, लॉर्ड्सला क्रिकेटची पंढरी असं म्हणतात. त्यामुळे या मैदानावर सामना जिंकणं हे कुठल्याही संघासाठी अतिशय खास असतं. कपिल देव, एमएस धोनी आणि विराट कोहलीनंतर युवा कर्णधार शुभमन गिलला सामना जिंकून इतिहास रचण्याची संधी होती.

भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यामध्ये पार पडलेल्या सामान्यामध्ये टीम इंडियाला तिसऱ्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. यामध्ये भारताच्या फलंदाजांनी फारच निराशाजनक कामगिरी केली. भारताचा एक फलंदाज फक्त शेवटपर्यंत लढत राहिला. तो म्हणजे रवींद्र जडेजा. यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, शुभमन गिलसारखे फलंदाज फलंदाजीमध्ये फेल झाल्यानंतर जगातील नंबर १ अष्टपैलू रवींद्र जडेजा याने भारतीय संघाच्या विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या. पहिल्या इनिंगनंतर दोन्ही संघानी सामन्यामध्ये बरोबरी केल्यानंतर दुसऱ्या डावात भारताच्या संघाने इंग्लंडच्या संघाला टीम इंडियाने १९२ धावांवर रोखले होते.

भारताच्या क्रिकेट चाहत्यांना टीम इंडिया हा सामना लगेचच जिंकेल असे अंदाज लावले जात होते. पण, म्हणतात ना, जसं दिसतं तसं नसतं! भारताच्या संघाने पाचव्या दिवशी पहिल्याच सत्रात तीन गडी गमावून पराभवाची घंटा वाजवली होती. दुसऱ्या चौथ्या दिवशी शुभमन गिल, करुण नायर, यशस्वी जयस्वाल आणि आकाशदीप हे फलंदाज पॅव्हेलियनमध्ये परतले होते. तर, पाचव्या दिवशी भारताचा संघ पूर्णपणे कोसळला होता. भारताने पाच षटकांमध्ये पाच गडी गमावले होते

भारताने हा सामना २२ धावांनी गमावला असला, तरी अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजाने सर्वांचे मन जिंकले. लॉड्र्सवर १९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना तो खंबीरपणे उभा राहिला. सातव्या क्रमांकावर खेळताना त्याने १८८ चेंडूंत नाबाद ६१ धावा केल्या. मात्र, सलामीच्या फलंदाजांनी माती खाल्ल्याने भारताला १९३ धावासुद्धा पहाडएवढ्या ठरल्या. कर्णधार शुभमन गिलने महत्त्वाच्या क्षणी खेळी करणे गरजेचे असताना, तो यात अपयशी ठरला.

भारतीय संघाची लॉर्ड्सवर झालेल्या पराभवानंतर २६ वर्षांपूर्वीच्या जुन्या जखमेवरील खपली निघाली आहे. दोन्ही सामन्यात भारताने शेवटची विकेट गमावण्याची पद्धत सारखीच होती. सिराज ज्याप्रमाणे लॉर्ड्सवर बाद झाला, त्याचप्रमाणे चेन्नईमध्ये श्रीनाथ आऊट झाला होता. तेव्हा श्रीनाथला सकलेन मुश्ताकने बाद केले होते. मुश्ताकने दुसरा चेंडू टाकला, ज्यावर श्रीनाथने बॅकफूट डिफेन्स केला. मात्र, चेंडू टप्पा खाऊन श्रीनाथच्या पायांच्या मधून स्टंप्सवर आदळला होता. सिराजही अशाच पद्धतीने बाद झाला.

लॉर्ड्सच्या मैदानावर सर्वात मोठ्या आव्हानांचा पाठलाग करणाऱ्यांमध्ये १९८४ मध्ये वेस्टइंडिज विरुद्ध इंग्लंड १ गडी बाद ३४४ धावा, २००४ इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड ३ गडी बाद २८२ धावा, २०२५ दक्षिण आफ्रिका विरुद्ध ऑस्ट्रेलिया ५ गडी बाद २८२ धावा, १९६५ इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड ५ गडी बाद २७९ धावा, २०१२ इंग्लंड विरुद्ध वेस्टइंडिज ५ गडी बाद १९३ धावा, २००० साली इंग्लंड विरुद्ध वेस्टइंडिज ८ गडी बाद १९१ धावा करुन सामन्यात विजय मिळविण्यात यशस्वी झाला होता. अशा अविस्मरणीय सामन्यांमध्ये भारताला आपले स्थान मिळवता आले असते. पण, फलंदाजांनी केलेल्या हाराकीरीमुळे ते शक्य झाले नाही. या सर्वातून बोध घेऊन पुढील कसोटीत फलंदाज, गोलंदाज चांगले प्रदर्शन करतील, एवढीच अपेक्षा करुया.

## लोकसंसद

### वेस्ट इंडिज क्रिकेटची शोकांतिका

जमैकाच्या किंग्स्टनच्या सबिना पार्क स्टेडियमवर वेस्ट इंडिज आणि ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघात दिवस-रात्र खेळविल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कच्या प्रभावी गोलंदाजीमुळे ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिज संघाला अवघ्या २७ धावांवर गुंडाळले आणि सामना जिंकला. वेस्ट इंडिज संघ न्यूझीलंडनंतर कसोटीत सर्वात कमी धावसंख्येवर बाद होणारा कसोटी क्रिकेटमधील दुसरा संघ बनला आहे. कसोटी क्रिकेट इतिहासातील सर्वात कमी धावसंख्येचा विश्वविक्रम न्यूझीलंडच्या नावावर असून १९५५ मध्ये ऑकलंड येथे इंग्लंडविरुद्ध न्यूझीलंडचा डाव फक्त २६ धावांवर आटोपला होता. १९६० ते १९८५ या काळात फ्रँक वॉरेल, क्लाईड वॉलकॉट, एव्हर्टन वीक्स, रोहन कन्हाय, गारफील्ड सोबर्स, व्हिव्हियन रिचर्ड्स, क्लाईव्ह लॉईड, माल्कम मार्शल, अँडी रॉबर्ट्स, ब्रायन लारा, कर्टली ॲम्ब्रोस, कर्टनी वॉल्श अशा अतिरथी आणि महारथी क्रिकेटपटूंनी क्रिकेट जगतात वेस्ट इंडिज संघाचा दबदबा निर्माण केला होता. एकेकाळच्या क्रिकेट विश्वातील या अनभिषिक्त सम्राट असलेल्या बलाढ्य वेस्ट इंडिज क्रिकेट संघाची सध्याची परिस्थिती पाहून सच्च्या क्रिकेटप्रेमींना दुःख होते. कारणे काहीही असोत, आजच्या घडीला वेस्ट इंडिज क्रिकेटची शोकांतिका झाली आहे हे वास्तव आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

### तृतीय पंथीयांनी स्वत:च परिवर्तन करावे !

नवी मुंबईतील वाशी येथील 'लेटस सेलिब्रेट फिटनेस' संस्थेच्या सौजन्याने ''सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' आयोजित करण्यात आलेल्या अभियानात तृतीय पंथीयांनी सहभाग घेतला.त्यामुळे यांच्यातील आत्मविश्वास दिसला. ते समाजातील इतर वर्गाप्रमाणे चांगले जीवन जगू शकतात. त्याकरिता त्यांनीच स्वतः आपल्यातील परिवर्तन घडवून आणावे.महाराष्ट्र शासनाने यांना अनेक सवलती देऊन इतर वर्गाच्या बरोबरीने नोकरीत प्राधान्य दिले आहे. त्यांना आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, इत्यादी कागद पत्रे मिळणार आहे. तसेच, जनगणना होणार आहे. या पंथातील लोकांनी हिडीस प्रथा बंद करून नोकरीच्या संधी शोधाव्या. त्यांच्या जीवनात चांगले बदल होतील. रेल्वे प्रवासात प्रवाशांच्या पुढे हात पसरणे, जंक्शन सिग्नल येथे वाहनचालकांपुढे हात पसरणे काही दिले नाही तर अपशब्द बोलणे, एखाद्या वस्तीत नूतन बालक जन्मले असेल तेथे जाऊन धिंगाणा घालणे बंद करावे. कोणी कोणाला शाप दिले म्हणून कोणाचे काही बिघडत नाही.नाहीतर भारत-पाक देशातील वैर शापाने संपले असते. या भाकड कथा आहेत.

**- महादेव गोळवसकर, मुंबई**

## दिनविशेष

# अपोलो-११ अंतराळयानाचे पहिले प्रक्षेपण

अपोलो-११ हे अमेरिकेने केलेले आणि नासाने प्रक्षेपित केलेले अंतराळ उड्डाण होते. मानवांनी चंद्रावर उतरण्याची ही पहिलीच वेळ होती. १६ जुलै रोजी फ्लोरिडातील मेरिट आयलंडवरील केनेडी स्पेस सेंटर येथून सॅटर्न व्ही रॉकेटद्वारे अपोलो ११ लाँच करण्यात आले. हे नासाच्या अपोलो कार्यक्रमाचे पाचवे क्रू मिशन होते.

अपोलो अंतराळयानाचे तीन भाग होते: तीन अंतराळवीरांसाठी केबिन असलेले कमांड मॉड्यूल, पृथ्वीवर परतणारा एकमेव भाग; एक सर्व्हिस मॉड्यूल, जे कमांड मॉड्यूलला प्रणोदन, विद्युत शक्ती, ऑक्सिजन आणि पाणी यासह समर्थन देत होते; आणि एक चंद्र मॉड्यूल ज्यामध्ये दोन टप्पे होते: चंद्रावर उतरण्यासाठी एक



उतरण्याचा टप्पा आणि अंतराळवीरांना चंद्राच्या कक्षेत परत ठेवण्यासाठी एक चढण्याचा टप्पा.

अपोलो-११ या यानाने नील आर्मस्ट्राँग आणि एडविन आल्ड्रिन चंद्रावर उतरले. त्यांच्या रूपाने पहिल्यांदाच चंद्रावर मानवी पाऊल पडले. या मोहिमेपूर्वी चंद्रासारखा पृष्ठभाग असलेल्या अमेरिकेतील अरिझोना उल्कापात विवर, सनसेट विवर येथे चांद्रवीरांनी सराव केला होता. ग्रीक पुराणातील प्रकाशाची देवता असलेल्या झिअसच्या पुत्राचे नाव अपोलो होते त्यावरून या मोहिमेला अपोलो असे नाव देण्यात आले होते.

१११ मीटर (३६३ फूट) उंच, ३,०३८,५०० किलो (६,६९८,७०० पौंड) वजनाच्या या महाकाय सॅटर्न व्ही प्रक्षेपण यानाने लाखो प्रेक्षकांसमोर केप केनेडी (आता केप कॅनावेरल) येथील पॅड ३९ए वरून निर्दोष उड्डाण केले तेव्हा मानवतेची स्पंदने वाढली. ट्रान्सलुनर इन्सर्शन इतके अचूक होते की मार्गातील तीन मार्गक्रमण दुरुस्त्या आवश्यक नव्हत्या. अपोलो ११ मध्ये आर्मस्ट्राँग, अल्ड्रिन आणि कमांड मॉड्यूल पायलट होते.

१८ जुलै १९६९ रोजी आर्मस्ट्राँग आणि ऑल्ड्रिन यांनी इगलमधून चंद्रावर उतरण्यासाठी आवश्यक पोषाख केला आणि सराव केला. सुमारे २,४०,००० मैलांचा प्रवास ७६ तास केल्यानंतर अपोलो ११ हे यान १९ जुलै दिवशी चंद्राच्या कक्षेमध्ये पोहोचले. २० जुलै १९६९ रोजी इगलचंद्राच्या पृष्ठभागावर उतरले. आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. २४ जुलै १९६९ रोजी परतीचे वाहन कोलंबिया मोड्युल पृथ्वीवर परतले. अपोलो-११ मोहीम यशस्वी झाली व अध्यक्ष केनेडी यांनी पाहिलेले स्वप्न साकार झाले.

१६ जुलै १९६९ रोजी प्रक्षेपण झाल्यापासून ते २४ जुलै रोजी परतीच्या प्रवासापर्यंत, अपोलो ११ च्या उड्डाणाचे जवळजवळ प्रत्येक प्रमुख पैलू टेलिव्हिजनद्वारे जगाच्या जवळजवळ प्रत्येक भागात लाखो लोकांनी पाहिले.

अपोलोच्या एकूण अवकाश मोहिमेसाठी जवळजवळ ३० अब्ज डॉलर खर्च आला. चंद्राची वारी केलेल्या अंतराळवीरांनी सुमारे ३६५ किलो वजनाचे चंद्रावरील मातीचे आणि खडकांचे नमुने पृथ्वीवर आणले. अनेक देशांच्या वस्तुसंग्रहालयांना तसेच वैज्ञानिक प्रयोगशाळांना अभ्यासासाठी आणि लोकांच्या जिज्ञासापूर्तीसाठी त्यातले काही तुकडे भेट म्हणून देण्यात आले. अमेरिकेच्या अपोलोनंतरच्या अवकाश मोहिमेसाठी म्हणजे स्कायलॅबया अवकाशस्थानकासाठी (स्पेस स्टेशन) अपोलो यानाकरिता विकसित केलेल्या घटकांचा मोठ्या प्रमाणात उपयोग झाला.

# बौद्ध महासभेच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद




**| वावोशी | वार्ताहर |**

दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा तालुका रोहा, जिल्हा रायगड यांच्या वतीने रोहा येथील पडम बुद्ध विहार येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर व वर्षावास मालिकेचा भव्य प्रारंभ करण्यात आला. हा कार्यक्रम आषाढ पौर्णिमा या पवित्र दिनानिमित्त आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास कोकण विभाग अध्यक्ष एम. डी. कांबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमादरम्यान धम्माचे महत्व, संघटनात्मक बांधणी, युवा कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आणि आगामी वर्षावास उपक्रमांवर विस्तृत चर्चा झाली. तसेच नवीन कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन व संघटन सशक्त करण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमास लक्ष्मण सताणे, सुरेश जाधव, सुरेश वाटवे, सुभाष इंगळे, दामोदर मोरे, सूर्यकांत कांबळे, अमोल वाटवे, अनिल वाटवे, राजेश शिर्के, आप्पा तुळवे, तुळशीराम तुळवे, रुपेश शिंदे, मनोज शिंदे आदी उपस्थित होते.

## सुवर्णकण



प्रपंच तुंबून देखील राहत नाही तसेच तो संपत देखील नाही तो आपल्याला सर्व काळ ग्रासून असतो.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय
आबामहाराज परांजपे
साधना आश्रम,
दातार आळी,
पेण.**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ जुलै

१)श्री.रमेश लक्ष्मण जुईकर
अलिबाग,
१६-०७-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



**आजचे अन्नदाते**

**सिद्धांत उन्मेष पाटील,
वाढदिवस, अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**मुख्य संपादक**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली खुद्द मिळकत विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन


मौजे सहाण, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट नं.२०९, क्षेत्र ०.२०.८० हे. आर, पो.ख. ०.०४.२० हे. आर. एकुण क्षेत्र ०.२५.०० हे. आर., आकार रू.३.८३ पैसे, या भातशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक, श्रीमती भारती सागर सामंत, रा. सी.१०३, स्वानंद समर्थ मठ, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे मालकीची व ताबे कब्जाची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ वरुन तसे दिसते. सदर मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायम फरोक्त घेण्याची ठरविले आहे. तरी सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून फरोक्तखत रजिस्ट्रर केले जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

अलिबाग.
दिनांक:- १५/०७/२०२५

**ॲड. पंकज नारायण देशमुख,**
रा. शंकर राम कॉम्प्लेक्स, शॉप नं.५,
आय.डी.बी.आय.बँकेसमोर, पेण,
ता.पेण, जि.रायगड.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने -नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.नामदेव गोमा ठाकुर आणि श्री.अमित नामदेव ठाकुर, यांनी मौजे तळवळी, ता.मुरूड, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक कृष्णा राजाराम काटकर, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले होते व त्याअनुषंगाने दैनिक कृषिवल, रायगड आवृत्ती आणि रत्नागिरी टाईम्स रायगड आवृत्ती या वृत्तपत्रामध्ये दिनांक १२/०७/२०२५ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. परंतु आमचे अशील श्री.नामदेव गोमा ठाकुर आणि श्री.अमित नामदेव ठाकुर यांनी त्यांचे आर्थिक अडचणीस्तव विद्यमान मालक श्री.कृष्णा राजाराम काटकर यांचे सोबत ठरविलेला व्यवहार रद्द केला आहे. तरी सदर मिळकती संदर्भात आमचे अशिलांचा कोणताही संबंध राहीलेला नाही. सदर मिळकत विद्यमान मालक हे कोणासही विक्री करू शकतात व सदर व्यवहारास आमचे अशिलांची कोणतीही हरकत असणार नाही. कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| तळवळी, ता.मुरूड जि.रायगड | ८ | वरकस ०-७३-०० पो.ख.०-२०-०० एकुण क्षेत्र ०-९३-०० | ०.७५ |

अलिबाग
दि. १५/०७/२०२५
मोबा. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु.वरसोली, बुरूमखाण
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, माझ्या आशिलांनी सांगितल्यावरुन मी, **(१) श्री जयंत गोविंद पाटील, (२) श्रीमती विद्या वसंत पाटील, (३) श्रीमती सरीता धनंजय पालसोकर, (४) श्रीमती अनुराधा निखिल माईनकर, (५) श्री शंतनु प्रभाकर पानसरे, (६) श्री. गौतम प्रभाकर पानसरे, (७) श्रीमती शुभदा अनिल कुलकर्णी** यांच्या खाली **परिशिष्टात** वर्णन केलेल्या जमिन मिळकतीं व त्यावर स्थित इमारतीं/ संरचना (ज्यांस यापुढे **"सदर मिळकत"** असे संबोधले आहे) संदर्भातील हक्क, स्वामित्व व हितसंबंध तपासत आहे.

तरी सदर मिळकत किंवा कोणत्याही भागाच्या बाबतीत अगर कोणत्याही हिश्श्याच्या बाबत कोणत्याही व्यक्ती/ व्यक्तींचा अथवा इसम/ इसमांचा कोणताही कोणत्याही प्रकारचा विक्रीच्या मार्गाने, अदलाबदल, तारण, गहाण (संपाश्विक / कोलॅटरल किंवा अन्य कोणतेही), चार्ज, बक्षिस, न्यास, वारसा, टेनन्सी, ताबेकब्जा, भाडेपटटा, पोट भाडेपटटा, लायसन्स, लिन, वहिवाटीचा हक्क, भोगवटा हक्क, कुलमुखत्यापत्र, कंत्राट, सामंजस्याचा करार, कौटुंबिक व्यवस्थापन, समझोता, कोणत्याही कोर्टाचा ॲवार्ड अथवा हुकुम, लिसपेंडन्स, मनाई हुकुम, स्थगिती आदेश, जैसे थे परिस्थिती, ॲटॅचमेंट, आरक्षण, पुर्नविकसन, भागिदारी, सह उदयोग, सह विकसन, किंवा इतर कोणतेही देणे किंवा वचनबध्दता किंवा कोणतीही व कोणत्याही प्रकारची मागणी किंवा अन्य कोणतीही हरकत / हरकती असतील तर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत लेखी हरकती संबंधीत कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्या १२०१, गिरिराज टॉवर्स, प्लॉट क्र. ५, सेक्टर २०, रोडपाली, नवी मुंबई ४१०२१८ व/किंवा shrikant.kherkar@gmail.com या पत्त्यावर कळवाव्यात ही विनंती. याप्रमाणे मुदतीत हरकती कळविण्यात असफल ठरल्यास सदर नोटीसीत नमुद सदर मिळकतीं संबंधी जे कोणते क्लेम / हरकती असतील ते अशा व्यक्तीने / व्यक्तींनी सोडले व/ किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल व माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यास मुक्त असतील.

**संदर्भित परिशिष्ट ("सदर मिळकती")**

अलिबाग शहर, अलिबाग नगर पालीकेच्या हददीतील, अलिबाग रामनाथ रोड, शहर आणि तालुका अलिबाग व नोंदणी जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथील जमिन मिळकती **(१) सर्व्हे नं./ हिस्सा नं. ८७/१** क्षेत्र ०हे-२७आर-३३ पॉ, **(२) सर्व्हे नं./ हिस्सा नं. ८७/२** क्षेत्र ०हे-२५ आर-७२पॉ, **(३) सर्व्हे नं./ हिस्सा नं. ८७/३** क्षेत्र ०हे-२५आर-०२ पॉ. आणि **संबंधित सिटीएस नं. १०२९** क्षेत्र ७८०६.९० चौ. मी., **सिटीएस नं १०२९/१** क्षेत्र १५२.१७ चौ. मी., आणि **सिटीएस नं १०२९/२** क्षेत्र ७.५३ चौ. मी., त्यावर स्थित इमारतींसह व त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे -

उत्तरेस : डिएसपी बंगलोस जाणारा रस्ता
दक्षिणेस : सिटीएस नं. १०२८ आणि १०२७
पूर्वेस : रस्ता
पश्चिमेस : सिटीएस नं. १०३०

**तारीख : १६ जुलै, २०२५**

**श्री. श्रीकांत म. खेरकर**
ॲडव्होकेट

## जाहिर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, मौजे तिवरे, ता कर्जत, जि रायगड येथील जमीन मिळकतींचे मालक १) गणपत गजानन ठाणगे २) अरूण गजानन ठाणगे ३) सोमनाथ गजानन ठाणगे ४) दगडीबाई मारूती ठाणगे ५) कमल प्रकाश पाटील ६) चंद्रशेखर मारूती ठाणगे ७) चित्रा अरूण पाटिल ८) याचिका योगेश सोरखादे ९ ) वनिता मारूती ठाणगे यांचेकडून आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत, कायमची विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पा. | आकार |
|---|---|---|---|
| २ | ५ | ०.४४.५० | ८.३५ |

सबब सदर बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास, सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १६/०७/२०२५

**ॲड रूपेश एकनाथ पाटील**
बी.ए.एल.एल.बी
शिव ओम अपार्टमेन्ट, गाळा नं १०
कचेरी रोड, मुर्दे बु, कर्जत
ता.कर्जत, जि रायगड
मो. ९०९६०६०४०४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल १) डॉ. अक्षय रामा कोळी २) डॉ. निरज रामा कोळी दोघेही रा.पर्णकुटी, दैनिक कृषिवल समोर, वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक दिपाली विनय हेगडे रा.चौल, ता.अलिबाग, जि.रायगड. यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १५०१/१ | ०-९४-०० पो.ख. ०-२६-२० एकुण १-२०-२० | २८-१३ |

वर नमुद केलेल्या मिळकतींपैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे ०-०८-०० हे. आर पो. ख. ०-०२-५० हे.आर. एकुण ०-१०-५ हे.आर. आकार २-३९रु. पैसे क्षेत्र हे या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १५-०७-२०२५.

सही/-
**ॲड.प्रदिप गो.तांडेल**
ओम निवास श्री. स्वामी समर्थ नगर,
पिंपळभाट चेंढरे अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चिंचघर, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी असणारे विद्यमान मालक श्री.सुहास नंदकुमार साळुंखे यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-१३-५०(हे.आर.चौ.मी), श्री.सुधिर एकनाथ म्हात्रे यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-०५-००(हे.आर.चौ.मी) व मयत कै.धनंजय एकनाथ पाटील यांचे कायदेशीर वारस श्रीमती.सुगंधा धनंजय पाटील, श्री.साईनाथ धनंजय पाटील, श्री.निरंतर धनंजय पाटील, निलम जगदीश कडू पुर्वाश्रमीची निलम धनंजय पाटील यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-०५- ५० (हे.आर.चौ.मी) असे तिन्ही मालकांचे एकूण ००-२४-००(हे.आर.चौ.मी) एवढे क्षेत्र हे त्यांचेकडुन कायमस्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| चिंचघर | २०/१/ब | ००-२४-०० | ६.१२ |

वर वर्णन केलेल्या सदरहू जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी भोगवटादार व मालक म्हणून असणारे विद्यमान मालक मालक श्री.सुहास नंदकुमार साळुंखे यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-१३-५०(हे.आर.चौ.मी), श्री.सुधिर एकनाथ म्हात्रे यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-०५-००(हे.आर.चौ.मी) व मयत कै.धनंजय एकनाथ पाटील यांचे कायदेशीर वारस श्रीमती. सुगंधा धनंजय पाटील, श्री. साईनाथ धनंजय पाटील, श्री. निरंतर धनंजय पाटील, निलम जगदीश कडू पुर्वाश्रमीची निलम धनंजय पाटील यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-०५-५० (हे.आर.चौ.मी) असे तिन्ही मालकांचे एकूण ००-२४-००(हे.आर.चौ.मी) एवढे क्षेत्र हे प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे. वर नमूद सदरची जमिन मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचीही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात आणून द्यावेत. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडुन दिला आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पेण
दि.३०/०६/२०२५

**ॲड. संदेश दिनकर गावंड**
रा.मु.दुरशेत, पो.बळवळी ता.पेण, जि.रायगड
मो.क्र.७०३०३३३६५४/८६०५४१४५६७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे डोलवी, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी असणारे विद्यमान मालक सौ.संगिता जनार्दन पाटील व जनार्दन सुदाम पाटील यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-२४-०० (हे.आर.चौ.मी) एवढे क्षेत्र हे त्यांचेकडुन कायमस्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| डोलवी | २७/२/क | ००-४२-०० | ८.१९ |

वर वर्णन केलेल्या सदरहू जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी भोगवटादार व मालक म्हणून असणारे विद्यमान मालक सौ.संगिता जनार्दन पाटील व जनार्दन सुदाम पाटील यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-२४-००(हे.आर.चौ.मी) एवढे क्षेत्र हे प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे. सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे, मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचीही विक्री, गहान, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात आणून द्यावेत. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडुन दिला आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण-पेण
दि.

**ॲड. संदेश दिनकर गावंड**
रा.मु.दुरशेत, पो.बळवळी ता.पेण, जि.रायगड
मो.क्र.७०३०३३३६५४/८६०५४१४५६७

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
### जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.२४०/२४

१ श्री. सलमान इस्तियाक खान
रा. रुम नं.१२, सैय्यद बेगम चाळ, शास्त्रीनगर कलिना,
सांताक्रुझ पूर्व, मुंबई-४०० ०२९
२ श्रीम.नाईला परविन इस्तियाक
रा.ग्याबनशा दर्गा रोड, नारायण नगर, घाटकोपर प — अपिलार्थी
रुम नं.२. मुंबई-४०० ०८६
३ श्रीम.उजमा परविन इस्तियाक
रा.बी १ इंडस्ट्रीय मार्केट, ए जी किंग रोड, महाराष्ट्र वजन काटा,
विरुद्ध दिशेने, साकी नाका, मुंबई ४०० ०७२

**विरुद्ध**

१ श्री.अब्दुल्ला इस्तियाक अहमद खान
रा.रुम नं.१२, सयदा बेगम चाळ, शास्त्रीनगर, अलिम टेलरच्या बाजूला, कलिना सांताक्रुझ पूर्व, मुंबई-४०००२९
२ श्री.साजिद इस्तियाक खान
रा.रुम नं.१, जगवानी चाळ, मसरानी लेन, हलावू पूल,
दादामियाँ बिल्डींगच्या बाजूला, कुर्ला पश्चिम, मुंबई - ४०००७० — उत्तरार्थी
३ श्री. फरहात खातून इस्तियाक खान
रा.रुम नं.१२, सयदा बेगम चाळ, शास्त्रीनगर, अलिम टेलरच्या बाजूला, कलिना सांताक्रुझ पूर्व, मुंबई - ४०००२९
४ उपविभागीय अधिकारी पनवेल

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे पाले खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं. ७०/४ क्षेत्र ०-१८-८० हे.आर. आकार ४.०४, ७१/३ क्षेत्र ०-०८-६० हे.आर. आकार १.३१, ७४/४ क्षेत्र ०-१६-० हे.आर. आकार १.०६ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील आरटीएस अपील क्र.२५/२०२१, दि.३०/१२/२०२२ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि.०१/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १४/०७/२०२५

सही/-
**अपर जिलाधिकारी रायगड
अलिबाग करीता**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत तिचे मालक रंजित हरिचंद्र भगत यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५८ | १/अ | ०-५९-०० | ०.५० |
| ५८ | १/ब | ०-३४-०० | ०.०४ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, बक्षीस, वहिवाट, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही निर्वेध, बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. १६/०७/२०२५
मो. ९८५०८९९२२९

**ॲड. सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्रे(बु.)
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | प्लॉट नं. | क्षेत्र चौरस मिटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) शुभांगी केसरीनाथ उल्लेगल २) केसरीनाथ नारायण उल्लेगल | ५६ | ३३ | २२६.०० | २२ | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१

सही /-
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :-१५/०७/२०२५
मो.नं.९३७२९६४६६५

## जाहीर नोटीस
दिनांक १४/०७/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्रीमती उत्तरेखा | १९/४/ब/१ | ०-२३-५० | १-१७ |
| उर्फ | १९/४/अ | ०-३०-४० | ०-३८ |
| लता उत्तम गायकर | १९/१ | ०-०७-३० | ०-११ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जीमन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस
दिनांक १४/०७/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे पाली तर्फे कोतल खलाटी, ता.कर्जत, जि.रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री.अरविंद नारायण रामाणी | १८/३ | ०-१६-०० | ०-२० |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्ट, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जीमन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की आमचे अनिल नोंदणीकृत खरेदीखताद्वारे मौजे पाथरज तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील अचल मालमत्ता जी कुमारी मिथिला उल्हास कंदलगावकर यांच्या मालकीची आहे. खरेदी करण्याचा प्रस्ताव करीत आहेत. सदर मालमत्तेचा तपशील असा आहे. गट क्र.१३. हिस्सा क्र.५ (० हे. ३४ आर. ८० गु.), गट क्र. १४, हिस्सा क्र. २ (० हे. १७ आर. ५० गु.), गट क्र. १६ (हिस्सा नाही -१ हे. ३५ आर. ०० गु.), गट क्र. १८. हिस्सा क्र. १ (५ है. ८६ आर. ०० गु.), गट क्र.२३. हिस्सा क्र. १ (२ हे.५० आर. ५५ गु.), हिस्सा क्र.५ (० हे. २९ आर. ०० गु.), हिस्सा क्र.६ (० हे. ०९ आर. ०० गु.), हिस्सा क्र.७(० हे. ४५ आर. ०० गु.), हिस्सा क्र.८ (० हे. १४ आर. ०० गु.), हिस्सा क्र. ९(० हे. ४३ आर. ०० गु.). तसेच गट क्र. २५. हिस्सा क्र. १ (३ हे. ०३ आर. ५० गु.), हिस्सा क्र. ४ (० हे ०३ आर. २० गु.). आणि हिस्सा क्र.६(० हे. ०४ आर. ०५ गु.).
तंदगभुतः सर्व हक हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर कोणाही व्यक्तिया/व्यक्तिचा याखालील मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात वारसा, विक्री, गहाणवट, भार, कर्ज, नियुक्त सुविधाधिकार, विनिमय, धारणाधिकार, परवाना, शिर्षक दस्तऐवज ठेव करुन, तारण, भेट, वहिवाट, ताबा, साठेकरार, विभाजन, कुळ, उप-कुळ, भाडयाने देणे, परवानगी आणि परवाना, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, कोणत्याही न्यासाअंतर्गत शिर्षकाचे हस्तांतरण किंवा फायदेशीर हित देखभाल, मृत्युपत्र, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/ तडजोड करार भागीदारी खटला कोणत्याही न्यायालयाचा न्यायाधिकरणाचा प्राधिकरणाचा आणि/किंवा मंचाची डिक्री, न्यायालयाचा आदेश, हुकुम, मागणी, संपादन किंवा कसाही ऋणभार किंवा इतर कोणताही अधिकार किंवा कोणत्याही स्वरुपाचा कोणताही दावा हिस्सा हवा. शिक हितसंबंध, लाभ आक्षेप आणि/किंवा मागणी असल्यास त्यांनी अधोस्वाक्षरीदारांना खाली दिलेल्या पत्त्यावर आणि ई-मेलवर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून २१ दिवसांच्या कालावधीत कागदोपत्री पुराव्यासहीत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, अशा व्यक्तिचा/संस्थेचा असा हिस्सा शिर्षक हक्क, हितसंबंध, लाभ दावा, मागणी किंवा आक्षेप, इत्यादी, जर असेल तर दुर्लक्ष केले जाईल आणि ते माफ केले गेले आहेत आणि सोडुन दिले गेले आहेत आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक नाहीत असे मानले जाईल.

स्थळ : कर्जत
तारीख : १६/०७/२०१५

सही/-
**कमलेश खराडे, भागीदार**

इंडिया लॉ आलायन्स
सूर्या महाल, पहिला मजला, ५. बुर्जरजी भरुचामार्ग, फोर्ट, मुंबई-४०००२३, इंडिया,
मो. नं +९१ ९८२०००८११४ / २२ २२६५२८३३
**kamlesh.kharade@indialawalliance.com**

# नव्या पिढीची पारंपरिक शेतीकडे पाठ

## शेती टिकविण्यासाठी कृषी विभागाचे प्रयत्न



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

**पारंपरिक शेती हा रायगडचा शेतीनिष्ठ गाभा आहे. त्यामुळे शेतकरी हा भारताच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. आता शेती करणे परवडत नाही अशी ओरड ऐकायला मिळते, यात तथ्यदेखील आहे. खर्च जादा आणि उत्पन्न कमी असे प्रकार अनुभवायला मिळतात. त्यातच नेहमीच शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत आहे. ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, अतिवृष्टी व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना जंग जंग पछाडले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील विविध प्रकारच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. एकंदरीत नेहमीच होणारा निसर्गाचा कोप आणि वाढती महागाई यामुळे जिल्ह्यातील शेतकरी पुरता संकटात सापडला आहे. त्यामुळे नव्या पिढीने शेतीकडे पाठ फिरविल्याचे जाणवत आहे.**

एकेकाळी रायगड जिल्हा भाताचे प्रसिद्ध कोठार होते. कालपरत्वे परिस्थिती बदलली आणि मुंबईला खेटून असणारा, औद्योगिक जिल्हा म्हणून प्रसिद्धीस आला. आज मितीस पूरक पिके शेतकरी घेत असला, तरी रायगडच्या उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या औद्योगिककरणामुळे येथील अनेक भागात आज जेवढी शक्य होईल तेवढी देखील भात शेती केली जात नाही. हंदा पद्धत आणि परक्याचे शेतमजूर घेऊन, भातशेती लावण्याची ही पद्धत श्रमविभागणी आणि खर्चाची बचत करणारी ठरली होती. परंतु, आधुनिक युगात वावरणारी पिढी आणि उरण तालुक्यात उभे राहिलेले नवनवीन प्रकल्प यामुळे काही प्रमाणात येथे लागवडीखाली शिल्लक राहिलेली भात शेती आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

शेतकरी हा महत्त्वाचा घटक आहे. त्यांनी शेतीच पिकविली नाही तर आपण संगणकीय जीवनात काय खाऊन जगणार आहोत, हा गंभीर प्रश्न आहेच. पूर्वी रायगड उरणच्या अनेक ग्रामीण भागात परक्याशी मजूर घेऊन भात लावणी केली जात होती. यामध्ये प्रत्येक शेतकरी दुसऱ्या शेतकऱ्याच्या शेतीवर भात लावणीसाठी व कापणी मळणीसाठी श्रमदान करायचा. हा सामूहिक लावणीचा प्रकार पूर्वापार चालत आलेला होता. परंतु, आत्ताच्या आधुनिक युगातील नव्या पिढीने शेतीकडे जाणून-बुजून दुर्लक्ष केले आहे. त्याचे कारणदेखील खरे आहे. शेतीसाठी लागणारी यंत्रसामुग्री व मजुरीचे दर भरमसाठ वाढल्याने शेती करणे शेतकऱ्यांना अवघड झाले आहे. एकंदरीत सर्वत्र वाढती महागाई यामुळे शेती व्यवसाय धोक्याच्या संकटात सापडला आहे. भात शेतीच्या लावणी, कापणीच्या वेळी अनेकदा मोठी गैरसोय होत होती. परंतु, या प्रक्रियेत चार-पाच कुटुंबे एकत्र येत, श्रमदानातून शेतीची कामे आनंदात करीत असत. त्यामुळे कशाचीही गैरसोय राहात नव्हती.

> **शेती टिकवण्यासाठी शासनाच्या कृषी विभागाचे जोरदार प्रयत्न सुरू असून, शेतकऱ्यांना आधुनिक शेतीच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने मंजूर केलेल्या शेतीच्या विविध योजना, शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी येथील कृषी विभाग प्रयत्नशील असून, शेती शाळेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण व मार्गदर्शनातून आधुनिक शेतीचे धडे दिले जात आहेत. तर सेंद्रिय शेती व फळ पिकांची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना आकर्षित केले जात आहे.**
> **– अर्चना सुळ नारनवर,**
> **उरण तालुका कृषी अधिकारी**

मात्र वाडवडिलांनी जपलेल्या या परंपरा आजच्या आधुनिक युगातही प्रेरणादायी ठरत असल्या, तरी नैसर्गिक आपत्ती व महागाई यामुळे त्या परंपरा नामशेष होण्याच्या मार्गावर आल्या आहेत.

# धानकान्हे गावाला पुराचा फटका

## कालव्याचे पाणी शिरले घरात



**| खांब | वार्ताहर |**

रोहा तालुक्यातील धानकान्हे येथे पुराचे पाणी मंदिरासह आजूबाजूच्या घरांमध्ये शिरले. त्यामुळे मंदिर, घरादारांचे फार मोठे नुकसान झाले आहे.

सोमवारी (दि. १४) पासून रात्रभर पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे. ठिकठिकाणी पाणी साठल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. त्यातच रोहा तालुक्यातील धानकान्हे या गावी गावालगत वाहत असलेल्या कालव्याचे पाणी ओव्हरफ्लो झाल्याने कालव्याचे पाणी थेट बाजूला असलेल्या गावाच्या मुख्य मंदिरात व आजूबाजूच्या घरांमध्ये शिरले. त्यामुळे मंदिरासह घरादारांचे फार मोठे नुकसान झाले आहे.

कालव्याची उंची गावापेक्षा जास्त असल्याने व गेली अनेक वर्षे कालव्याचे गाळ काढण्यात पुरेशी खबरदारी घेतली नाही. त्यामुळे पुराचे पाणी कालव्यात मावत नसून व कालव्यातील शिल्लक असलेल्या गाळामुळे पाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होत नसल्याने पुराचे पाणी कालव्यात ओव्हरफ्लो झाले. त्याचा फटका धानकान्हे येथील मंदिरासह घरादारांना बसला आहे. मंदिर सभागृहाचे व घरादारांचे झालेले नुकसान हे फार मोठे असल्याने याबाबत ग्रामस्थ लवकरच संबंधित विभागाला लेखी पत्र व्यवहार करून झालेल्या नुकसानीबाबत कळविण्यात येणार आहेत, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली आहे.

# फिजिओथेरपी कॉलेजचे उद्घाटन

**| पनवेल | वार्ताहर |**

कमलू पाटील यांचा ३३ वा स्मृतीदिन आणि कमल गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेच्या २८ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचा उद्घाटन सोहळा तळोजा फेज-२ येथे उत्साहात पार पडला. याप्रसंगी बबनदादा पाटील यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांना संबोधित करताना सांगितले, मी स्वतः शिकलो नाही, परंतु माझी मनापासूनची इच्छा आहे की माझ्या परिसरात एकही व्यक्ती अशिक्षित राहू नये. याच प्रेरणेतून मी विविध शैक्षणिक उपक्रम राबवत आहे. तसेच, पुढच्या टप्प्यात मेडिकल कॉलेज सुरू करण्याचाही मानस असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# सिगारेटच्या नादात गमावले लाखोंचे दागिने

**| पनवेल | वार्ताहर |**

अलिबाग येथील मित्रांसोबत आलेल्या एका व्यक्तीला ग्रिट्स बारमध्ये बिअर पिणे महागात पडले आहे. सिगारेट पिण्याकरिता बाहेर आला आणि पुन्हा आता जाताच अंगावरील सोने चोरी झाल्याची घटना घडली आहे.

अलिबाग परिसरात राहणारे अमोल पद्माकर पाटील हे कार्ले खिंडीत विला केअर टेकर म्हणून काम करतात. अमोल हे त्यांचे तीन मित्र कल्पेश, अतिश, जयेश असे चौघेजण पनवेल परिसरात कामानिमित्ताने आले होते. यावेळी यांचे काम पूर्ण झाल्यानंतर अमोल व तिघेही मित्र संध्याकाळच्या सुमारास पनवेल येथील ओएनजी गेटच्या बाजूला असलेल्या ग्रिट्स बारमध्ये बिअर पिण्यासाठी गेले होते. यावेळी अमोल यांच्या गळ्यात चार लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने होते. काहीवेळाने अमोल बारच्या बाहेर असलेल्या पानटपरीवर सिगारेट घेण्यासाठी आला होता. यावेळी अमोलने त्याचा मित्र असल्याचे समजून समोरच्या व्यक्तीला धक्का दिला व तो खाली पडला. यावेळी त्याठिकाणी किरकोळ झटापटी झाली. अमोलने समोरच्या व्यक्तीची माफी मागितली. अमोल पुन्हा बारमध्ये जाऊन बसला. या दरम्यान अमोलने गळ्यात घातलेले चार लाख रुपये किंमतीचे दागिने व मोबाईल अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचे समजले. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# तोतया पोलिसांकडून फसवणूक

**| पनवेल | वार्ताहर |**

पोलीस असल्याची बतावणी करून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करणाऱ्या भामट्यांनी कामोठे येथील एका ज्येष्ठ नागरिकांचे सोन्याचे दागिने लुबाडून नेल्याचे समोर आले आहे.

कामोठे येथे घडलेल्या घटनेत दोघा तोतया पोलिसांनी मुंबई पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गजानन चौगुले (६४) यांचे २ लाख ७० हजारांचे दागिने लुबाडून नेले. चौगुले हे सेक्टर-३२ येथील कब्रस्थानच्या रस्त्यावरून फिरण्यासाठी गेले होते. त्याचवेळी रेनकोट घालून आलेल्या एका भामट्याने त्यांना पोलीस कार्ड दाखवून या परिसरात गुन्हे होत असल्यामुळे त्यांना या परिसरात तपासणीसाठी नेमल्याचे सांगितले. त्यानंतर चौगुले यांना त्यांच्या जवळचे दागिने काढून दाखवण्यास सांगितले. चौगुले यांनी त्यास नकार दिला. मात्र त्याने जबरदस्तीने दागिने काढण्यास सांगितले व शेजारी दुचाकी घेऊन थांबलेल्या साथीदाराला बोलावून ते तपासण्यास सांगितले. त्यानंतर चौगुले यांनी दागिने परत मागितले असता, त्यांनी चौगुलेंना ढकलून दिले व दुचाकीवरून पसार झाले.

# खांब, आंबेवाडी नाक्याला तलावाचे स्वरूप

## व्यावसायिकांच्या दुकानात पाणी



**| कोलाड | वार्ताहर |**

संततधार पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे आंबेवाडी बाजारपेठेला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तसेच मुंबई-गोवा हायवेवरील खांब नाक्यावरही रस्त्यावर पाणीच पाणी साचले होते. त्यामुळे महामार्गांवरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागली. तर व्यावसायिकांच्या दुकानात पाणी शिरले असून व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महाराष्ट्र ६६ वरील चौपदरी करणाचे काम गेली १८ वर्षांपासून सुरु आहे. आंबेवाडी तसेच खांब नाक्यावरील असंख्य कामे अद्यापही अर्धवट स्थितीत आहेत. या अर्धवट कामांमुळे दोन्ही बाजापेठेत पूरस्थिती उद्धभवणार असल्याची बातमी पावसाळ्यापूर्वी वर्तमानपत्रातून प्रकाशित झाली होती. ती बातमी तंतोतंत खरी ठरली असल्याचे दिसून येत आहे.

मुंबई-गोवा महामार्गांवरील खांब येथील दिपक हॉटेल तसेच हॉटेल गोमांतक येथे तर भयानक परिस्थिती निर्माण झाली. या मार्गांवर वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत असून कोलाड पोलीस यंत्रणा तसेच रेस्क्यू टीम यांच्या सहकार्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली. तरी सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचे आव्हान प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# नेरळमध्ये विद्यार्थ्यांना भोजन ताटांचे वाटप



**| नेरळ | वार्ताहर |**

माथेरानमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दुपारीच्या वेळी मध्यान्ह भोजन दिले जाते. विद्यार्थ्यांना भोजन करण्यासाठी स्टील ताटे देण्याचा उपक्रम माथेरान मिशन आणि गिफ्ट अ स्माइल या संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आला.

माथेरान मिशन आणि गिफ्ट अ स्माईल या सामाजिक संस्थांच्या वतीने माथेरान शहरात अनेक लोकोपयोगी कामे केली जातात. शैक्षणिक आणि आदिवासी तसेच गरजू यांना विविध प्रकारची मदत गिफ्ट अ स्माइल या संस्थेचे तामिळ अमुघन हे करीत असतात. वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर येथील विद्यार्थ्यांना नियमित आहारासाठी स्टीलच्या थाळ्यांचे वाटप करण्यात आले. या शाळेतील १६५ विद्यार्थ्यांना स्टील ताटे देण्यात आली.

यावेळी मिशन माथेरान आणि गिफ्ट अ स्माइल या संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. समिती सदस्य स्टॅलिन मारियम आणि मुख्याध्यापक दिलीप अहिरे यांनी यांचा विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला. तर मिशन माथेरानचे संचालक तामिळ अमूधन, गिफ्ट अ स्माईलचे जॅक्सन, स्टॅलिन आणि त्यांचा परिवार उपस्थित होता. तसेच शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

# कार, ट्रकचा अपघात; दोन प्रवासी जखमी

**| पनवेल | वार्ताहर |**

पनवेल जवळील मुंबई-पुणे महामार्गावर मंगळवारी (दि. १५) सकाळी ईरटीका गाडी व ट्रकचा अपघात झाला. यात दोन प्रवासी जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सागर दिलीप गायकवाड (वय ३०, रा. कोंडवा, पुणे) हे धीरज गुप्ता (२७) यांच्यासह आपल्या ईरटीका कारने पुण्याहून मुंबईला जात होते. दरम्यान कारचे इंजिन गरम झाल्याने त्यांनी पनवेलजवळील किलोमीटर १/८०० मुंबई लेन येथे रस्त्याच्या बाजूला कार थांबवली. त्याचवेळी पाठीमागून येणाऱ्या ट्रकने कारला जोरदार धडक दिली. या अपघातात कारमधील दोघेही जखमी झाले. त्यांना उपचाराकरिता एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे नेण्यात आले आहे. अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला.

अपघाताची माहिती मिळताच पळस्पे वाहतूक पोलीस घटनास्थळी रवाना होत वाहतूक सुरळीत केली.

## परसबागेमध्ये विविध भाज्यांची लागवड | विद्यार्थी, पालकांचा उत्स्फूर्त सहभाग

# धारवली केंद्रशाळेत रोपवाटिका उपक्रम



**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

**रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा धारवली तालुका पोलादपूर येथे दरवर्षीप्रमाणे परसबागेमध्ये वेगवेगळ्या भाज्यांची लागवड करण्यात येते. याकरिता जुलै महिन्यातील पावसाचा जोर पाहता गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर शाळेच्या परसदारामध्ये रोपवाटिका तयार करण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम धारवली शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी हाती घेतला. १५ ऑगस्टपूर्वी तयार झालेली ही रोपे श्रावण महिन्यात त्याची जमिनीमध्ये लागवड केली जाते. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत शालेय परिसरात परसबागनिर्मिती ही मुलांच्या आरोग्यासाठी आणि शिक्षणासाठी फायदेशीर ठरत आहे.**

सलग तीन वर्ष ही शाळा तालुकास्तरीय उत्कृष्ट परसबाग स्पर्धेत सातत्याने पारितोषिक प्राप्त करीत आहे. दरवर्षी हा उपक्रम जुलै महिन्यात राबविला जातो. परसबाग निर्मितीकरिता शाळा व्यवस्थापन समिती व महिला पालकांचे बहुमोल योगदान लाभते. शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप पवार व उपशिक्षक सचिन सालेकर यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागातून शासनामार्फत पुरवण्यात आलेले बियाणे रोपवाटिका तयार करून परसबागेची पूर्वतयारी केली आहे.

या उपक्रमातून शालेय परिसरात विविध फळभाज्याची लागवड केली जाते. या फळभाज्यांच्या शालेय पोषण आहारात समावेश व्हावा याकरिता हा उपक्रम गटशिक्षणाधिकारी सुभाषराव साळुंके व दिपक जाधव यांच्या मार्गदर्शनखाली राबविण्यात आला.

> **परसबाग निर्मितीमुळे विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक निर्माण व्हावी, पोषक आहार मिळावा, कुपोषण दूर व्हावे, असे विविध सद्हेतू या उपक्रमामुळे साध्य होत आहेत. लोकसहभागाद्वारे परसबागनिर्मिती करून निसर्गसंगोपन आणि त्याद्वारे लाभणारा पोषक आहार याबद्दल विद्यार्थ्यांसहीत समाजजागृती करणे हेच या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट्य आहे.**
> **– प्रदीप पवार,**
> **शाळेचे मुख्याध्यापक**

# महिला पोलिसाचा हृदयविकाराने मृत्यू

**| पनवेल | वार्ताहर |**

नवी मुंबई पोलीस दलातील महिला पोलीस हवालदार अश्विनी चिपळूणकर यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे. कळंबोली सेक्टर १ येथील सत्यम पॅराडाईज इमारतीत त्या राहत होत्या. त्यांच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना मेडिकव्हर रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, उपचारादरम्यान अश्विनी चिपळूणकर यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात दोन मुले असून एक दुबईत कामाला आहे. तर दुसऱ्या मुलाचे शिक्षण चालू आहे. अश्विनी चिपळूणकर या १९९९ साली पोलीस खात्यात भरती झाल्या होत्या. त्यांच्या निधनाने कुटंबावर शोककळा पसरली आहे.

## निवडक



### शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयात इतिहास दिन साजरा

**पाली :** सु. ए. सो. च्या शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयात इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या जन्म दिनानिमित्ताने शनिवारी (दि. १२) इतिहास दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग यांनी आपल्या व्याख्यानातून छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आल्याचे जाहीर केले. हे स्पष्ट करुन महाराष्ट्राच्या ऐतिहासिक बाबीवर प्रकाश टाकला. तसेच, सण २०२४-०२५ या शैक्षणिक वर्षात मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेत इतिहास विषयातून १)ऋतिक कास्टे, २) सुरेश बरताड, ३) सुनील बांगारे हे क्रमशा पहिले तीन विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचा गुलाब पुष्प व गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ. अंकुश सोहनी यांनी केले. वि का राजवाडे यांनी महाराष्ट्रभर फिरून मोठ्या प्रमाणात कागदपत्रांचा शोध घेऊन मराठ्यांच्या इतिहासाबाबत महत्त्वाचे योगदान दिल्याचे सांगितले. त्याचबरोबर इतिहास विषयाचे लेखन करण्यासाठी संदर्भ साधनाचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाच्या प्राध्यापिका सरिता देशमुख यांनी केले, तर आकांक्षा मोकल या एमएच्या विद्यार्थिनीने आभार मानले.

### आर्याचा शिष्यवृत्ती परीक्षेत डंका



**रेवदंडा :** पनवेलमधील को.ए.सो. इंदुबाई अ. वाजेकर इंग्लिश मिडियम शाळेतील विद्यार्थिनी आर्या विनोद नाईक हिने महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत शाळेचा व कुटुंबाचा गौरव वाढवला आहे. आर्याने इयत्ता आठवीतून शिष्यवृत्ती परीक्षेत भाग घेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे रायगड जिल्ह्यातून ती सातव्या क्रमांकाने पात्र ठरली आहे. तिच्या या प्राविण्यामुळे तिला शासनामार्फत शिष्यवृत्ती मिळाली असून, तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. अभ्यासातील सातत्य, कष्ट आणि शिक्षक-पालकांचे मार्गदर्शन ह्यामुळेच हे यश शक्य झाल्याचे तिच्या पालकांनी सांगितले. आर्याने मिळवलेल्या यशामुळे अनेक विद्यार्थी आणि पालकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. आर्या नाईकच्या यशामुळे आज तिच्या शाळेत आणि परिसरात आनंदाचे वातावरण असून, शिक्षण क्षेत्रातील ही एक कौतुकास्पद कामगिरी मानली जात आहे.



### माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**रसायनी :** ज्ञानदीप सेवा मंडळ हायस्कूल येथे २५ वर्षांनंतर एस.एस.सी. बॅच २००१ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडला. स्नेहमेळाव्यासाठी २००१ च्या एस.एस.सी. बॅचचे अनेक विद्यार्थी उपस्थित होते. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांसह सध्याचे शिक्षक व काही माजी शिक्षकही या कार्यक्रमात सहभागी झाले होते. प्रत्येकाने आपापल्या आठवणींना उजाळा देत शाळेच्या सुवर्णक्षणांची आठवण काढली, तसेच शिक्षक व माजी विद्यार्थ्यांचे काही भावनीक क्षणही अनुभवायला मिळाले. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ आणि छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर इतक्या वर्षानंतर शिक्षकवर्ग, जुने मित्र भेटल्याचा आनंद, समाधान जाणवत होता. या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी शाळेचे अध्यक्ष, शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार केला. सोबतच एकत्र येऊन शाळेसाठी पुस्तके, पुस्तके ठेवण्यासाठी कपाट भेटवस्तू म्हणून दिले. तसेच, आजच्या दिवसाची आठवण म्हणून सर्व माजी विद्यार्थ्यांनाही भेट स्वरूपात सन्मानचिन्हे देण्यात आले.

### रसायनीत वीजपुरवठा खंडित

**रसायनी :** रसायनीतील महावितरणाच्या मोहोपाडा येथील वीज वितरण कार्यालयाच्या वतीने अखंडित वीजपुरवठा करण्याच्या अनुषंगाने मंगळवारी (दि.१५) २२ २ फिडर आणि रिलायन्स २ फिडरवर वाढलेल्या झाडांच्या फांद्या छाटणे आणि एच टी लाईनवरील इतर कामासाठी १०.०० ते ०४.०० या वाजेपर्यत विजपुरवठा खंडीत करण्यात आला होता. यावेळी रसायनीतील मोहोपाडा, नविन पोसरी, पराडे, दापिवली, खाने आंबिवली, आळी आंबिवली, जुनी पोसरी, चांभर्ली, शिवनगर, रीस, भटवाडी, तळेगांव, पानशिल, दांड फाटा या परिसरातील वीज पुरवठा ट्री कटिंग आणि जंपरिंग साठी बंद ठेवण्यात आला होता. यासाठी एक दिवस अगोदर नागरिकांना पूर्व कल्पना देण्यात आली होती.

## क्लासिफाईड्स
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहे. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास, ४) X-RAY साठी मुले, आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र सोबत आणावे. संपर्क : ७७४५०५००२५/९१११९५६५०२२/९३२१३०३९३८
- पांढरे डाग करा मुळापासून नष्ट : औषधामध्ये आहे याचा परिणाम या औषधाचा करा वापर पांढरे डागापासून मिळवा मुक्ती. संपर्क : ८९६९१३५३८९ यावर कॉल करा. घरीबसल्या औषध मिळवा.
- जुनी कपडे शिवायची मशीन पाहिजे ९७६५९८४५२५/७४२०८९२३१२
- अलिबागमध्ये लेडीज ब्युटी पार्लरमध्ये कामासाठी अनुभवी मुली पाहिजे. मो. ८१४९८६५६२५, ९९२१०७३९६३
- घरकामासाठी अलिबागमध्ये बाई पाहिजे. मो. ८१४९८६५६२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

THIS IS A PUBLIC ANNOUNCEMENT FOR INFORMATION PURPOSES ONLY AND IS NOT A PROSPECTUS ANNOUNCEMENT AND DOES NOT CONSTITUTE AN INVITATION OR OFFER TO ACQUIRE, PURCHASE OR SUBSCRIBE TO SECURITIES. NOT FOR RELEASE, PUBLICATION OR DISTRIBUTION DIRECTLY OR INDIRECTLY OUTSIDE INDIA.

CFF

Please scan this QR Code to view the Prospectus dated July 02, 2025

# CFF FLUID CONTROL LIMITED

**Corporate Identity Number is L28990MH2012PLC227023**

Our Company was incorporated as Flash Forge Fluid Control Private Limited on February 16, 2012 under the Companies Act, 1956 with the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra bearing Registration number 227023. The name of our company was changed to CFF Fluid Control Private Limited vide Special resolution dated September 21, 2012.The fresh certificate of incorporation consequent of name change was issued on October 19, 2012 by the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra. Further the status of the Company was changed to Public limited and the name of our Company was changed to CFF Fluid Control Limited vide Special Resolution dated September 05, 2022. The fresh certificate of incorporation consequent to conversion was issued on September 15, 2022 by the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra. The Corporate Identification Number of our Company is L28990MH2012PLC227023. For further details pertaining to the change of name of our Company and the change in Registered Office, please refer the chapter "History and Certain Corporate Matters" on page no. 122 of the Prospectus.

**Registered Office:** Plot No 01, Survey No 96, Kumbhivli Madap Khopoli, Khalapur, Raigarh-410203
**Corporate Office:** 503, Delphi, A Wing, Orchard Avenue, Hiranandani Business Park, Powai, Mumbai-400076
**Tel No.:** +91 - 22 – 40021599 | **Email:** compliance@cffdefensys.com | **Website:** www.cffdefensys.com
**Contact Person:** Sonika Mehta, Company Secretary and Compliance Officer

## OUR PROMOTERS: SUNIL MENON AND GAUTAM MAKKER

**"The Issue is being made in accordance with Regulations 103, 104 of Chapter IV read with Regulation 281 of Chapter IX of SEBI ICDR Regulations, 2018 (FPO of Small and Medium Enterprises) and the Equity Shares are proposed to be listed on the SME Platform of BSE Limited ("BSE").**

## BASIS OF ALLOTMENT

**FURTHER PUBLIC OFFER 15,00,000* EQUITY SHARES OF ₹ 10 EACH ("EQUITY SHARES") OF CFF FLUID CONTROL LIMITED ("CFF" OR THE "COMPANY") FOR CASH AT A PRICE OF ₹ 585 PER EQUITY SHARE (THE "ISSUE PRICE"), AGGREGATING TO ₹ 8,775.00 LAKHS ("THE ISSUE"), OF WHICH 78,000 EQUITY SHARES OF ₹ 10 EACH WILL BE RESERVED FOR SUBSCRIPTION BY MARKET MAKER TO THE ISSUE (THE "MARKET MAKER RESERVATION PORTION"). THE ISSUE LESS MARKET MAKER RESERVATION PORTION I.E. ISSUE OF 14,22,000 EQUITY SHARES OF ₹ 10 EACH IS HEREINAFTER REFERRED TO AS THE "NET ISSUE". THE ISSUE AND THE NET ISSUE WILL CONSTITUTE 7.15% AND 6.78%, RESPECTIVELY OF THE POST ISSUE PAID UP EQUITY SHARE CAPITAL OF THE COMPANY.**

## FIXED PRICE ISSUE AT ₹ 585/- PER EQUITY SHARE OF FACE VALUE OF ₹ 10.00/- EACH

**THE ISSUE PRICE IS 58.50 TIMES OF THE FACE VALUE**

**MINIMUM APPLICATION SIZE OF 400 EQUITY SHARES AND IN MULTIPLES OF 200 EQUITY SHARES THEREAFTER**

| BID/ ISSUE PROGRAM | BID/ISSUE OPENED ON: WEDNESDAY, JULY 09, 2025 |
|---|---|
| | BID/ISSUE CLOSED ON: FRIDAY, JULY 11, 2025 |

### RISKS TO INVESTORS

1. Our Company, Group Companies, Promoters and Directors are parties to certain legal proceedings. Any adverse decision in such proceedings may have a material adverse effect on our business, results of operations and financial condition.
2. Our existing manufacturing facility and upcoming manufacturing facility are concentrated in a single region i.e. Khopoli and Pune, Maharashtra, hence we face geographical concentration related risks.
3. If we are not able to obtain, renew or maintain our statutory and regulatory licenses, registrations and approvals required to operate our business, it may have a material adverse effect on our business, results of operations and financial condition.
4. Significant portion of our revenue is derived from contracts with Indian Defence PSU Shipyard during Financial Year 2024-25, 2023-24 and 2022-23 Decline of order book, contracts, and change in their requirement or fall in budget will have material adverse effect on our business, financial condition and result of operation.
5. Our business of manufacturing and supply of components, equipment and services required by Indian Defence PSU Shipyard is significantly dependent on the technology, process and product development of such components.
6. Our Promoter Group Entity is engaged in business activities which is similar to our line of business. This may be a potential source of conflict of interest for us and which may have an adverse effect on our business, financial condition and results of operations.
7. Our company is significantly dependent on few customers for our revenue in a particular financial year. The loss of any one or more of such customers may have a material effect on our business operations and profitability
8. We have reported negative net cash flows in the past and may do so in the future
9. In addition to normal remuneration, other benefits and reimbursement of expenses our directors (including our Promoters) and Key Management Personnel are interested in our Company to the extent of their shareholding and dividend entitlement in our Company
10. Our Promoters and Key Managerial Personnel play key role in our functioning and we heavily rely on their knowledge and experience in operating our business and therefore, it is critical for our business that they remain associated with us
11. The average cost of acquisition of Equity Shares by our Promoters is as follows:

**Weighted average price at which the Equity Shares were acquired by our Promoters in last one year:**

| Sr. No. | Name of Promoters | Average cost of Acquisition (in ₹) |
|---|---|---|
| I. | Sunil Menon | 5.57 |
| II. | Gautam Makker | 5.50 |

3. Weighted Average Cost of Acquisition calculated (on fully diluted basis for the trailing eighteen months) from the date of the Prospectus.

| Types of transactions | Weighted average cost of acquisition (₹ per Equity Shares) | FPO Issue Price (₹ 585/- per Equity Share) |
|---|---|---|
| WACA of Primary issuance | 165.00 | 3.55 Times |
| WACA of Secondary transactions | Nil | Nil |

**Investors are required to refer section Investors are required to refer section titled "Risk Factors" on page 23 of the Prospectus.**

### PROPOSED LISTING: WEDNESDAY, JULY 16, 2025*

The Issue is being made in terms of Regulations 103, 104 of Chapter IV read with Regulation 281 of Chapter IX of the Securities Exchange Board of India (Issue of Capital and Disclosure Requirements) Regulations, 2018 as amended ("SEBI (ICDR) Regulations"). This issue is a fixed price issue and allocation in the Net Issue to the public is made in terms of Regulation 253 of the SEBI (ICDR) Regulations. For further details, please refer chapter titled "Issue Procedure" beginning on page 217 of the Prospectus.

***Subject to the receipt of listing and trading approval from BSE Limited ("BSE").***

### SUBSCRIPTION DETAILS

The Issue has received 15166 applications for 1,20,79,200 Equity Shares resulting in 8.05 times subscription. The details of the applications received in the Issue (After removing multiple and duplicate bids, bids (UPI Mandates) not accepted by investors/ blocked, bids rejected under application banked but bid not registered and valid rejections cases from the 'Bid Book') are as follows:

**Detail of the Valid Applications Received:**

| Sr. No. | Category | No. of Applications | No. of Equity Shares Applied | Equity shares available for Allotment | No. of times subscribed |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Market Maker | 1 | 78000 | 78000 | 1.00 |
| 2. | Non-Institutional Investor's | 3936 | 7509600 | 710800 | 10.56 |
| 3. | Individual Investors | 11229 | 4491600 | 711200 | 6.32 |
| **Total** | | **15166** | **12079200** | **1500000** | **8.05** |

The Basis of allotment was finalized in consultation with the Designated Stock Exchange, being BSE Limited (BSE) on July 14, 2025 as per Regulation 253(2) of the SEBI (ICDR) Regulation, 2018.

1. **Allotment to Market Maker (After Technical Rejections):** The Basis of Allotment to the Market Maker, at the Issue Price of ₹ 585 per Equity Share, was finalised in consultation with BSE Limited. The category was subscribed by 1.00 times. The total number of shares allotted in this category is 78,000 Equity Shares. The category-wise details of the Basis of Allotment are as under:

| No. of Shares Applied for (Category wise) | No. of Applications Received | % of Total | Total No. of Shares Applied in Each Category | % of Total | No of Equity shares Allocated per Applicant | Ratio | Ratio | Total No. of shares allotted |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 78000 | 1 | 100.00 | 78000 | 100.00 | 78000 | 1 | 1 | 78000 |

2. **Allotment to Non-Institutional Investor's (After Technical Rejections):** The Basis of Allotment to the Non – Retail Investors, at the Issue Price of ₹ 585 per Equity Share, was finalised in consultation with BSE Limited. The total number of shares allocated in this category is 710800 Equity Shares and after that the category was subscribed by 10.56 times. The category-wise details of the Basis of Allotment are as under (sample basis):

| S.No | No. of Shares Applied for (Category wise) | No. of Applications Received | % of Total | Total No. of Shares Applied in Each Category | % of Total | No of Equity shares Allocated per Applicant | Ratio | Ratio | Total No. of shares allotted |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 600 | 1629 | 41.39 | 977400 | 13.02 | 600 | 151 | 502 | 294000 |
| 2 | 800 | 132 | 3.35 | 105600 | 1.41 | 600 | 40 | 132 | 24000 |
| 3 | 1000 | 62 | 1.58 | 62000 | 0.83 | 600 | 19 | 62 | 11400 |
| 4 | 1200 | 35 | 0.89 | 42000 | 0.56 | 600 | 11 | 35 | 6600 |
| 5 | 1400 | 41 | 1.04 | 57400 | 0.76 | 600 | 12 | 41 | 7200 |
| 6 | 1600 | 66 | 1.68 | 105600 | 1.41 | 600 | 20 | 66 | 12000 |
| 7 | 1800 | 1755 | 44.59 | 3159000 | 42.07 | 600 | 176 | 585 | 316800 |
| 8 | 2000 | 51 | 1.30 | 102000 | 1.36 | 600 | 15 | 51 | 9000 |
| 9 | 2200 | 12 | 0.30 | 26400 | 0.35 | 600 | 4 | 12 | 2400 |
| 10 | 2400 | 7 | 0.18 | 16800 | 0.22 | 600 | 2 | 7 | 1200 |
| 11 | 2600 | 20 | 0.51 | 52000 | 0.69 | 600 | 6 | 20 | 3600 |
| 12 | 2800 | 12 | 0.30 | 33600 | 0.45 | 600 | 4 | 12 | 2400 |
| 13 | 3000 | 13 | 0.33 | 39000 | 0.52 | 600 | 4 | 13 | 2400 |
| 14 | 3200 | 12 | 0.30 | 38400 | 0.51 | 600 | 4 | 12 | 2400 |
| 15 | 3400 | 5 | 0.13 | 17000 | 0.23 | 600 | 2 | 5 | 1200 |
| 16 | 3600 | 5 | 0.13 | 18000 | 0.24 | 600 | 2 | 5 | 1200 |
| 17 | 3800 | 2 | 0.05 | 7600 | 0.10 | 600 | 1 | 2 | 600 |
| 18 | 4000 | 4 | 0.10 | 16000 | 0.21 | 600 | 1 | 4 | 600 |
| 19 | 4800 | 2 | 0.05 | 9600 | 0.13 | 600 | 1 | 2 | 600 |
| 20 | 5000 | 5 | 0.13 | 25000 | 0.33 | 600 | 2 | 5 | 1200 |
| 21 | 6000 | 4 | 0.10 | 24000 | 0.32 | 600 | 1 | 4 | 600 |
| 22 | 8400 | 3 | 0.08 | 25200 | 0.34 | 600 | 1 | 3 | 600 |
| 23 | 9000 | 2 | 0.05 | 18000 | 0.24 | 600 | 1 | 2 | 600 |
| 24 | 15000 | 3 | 0.08 | 45000 | 0.60 | 600 | 1 | 3 | 600 |
| 25 | 17000 | 2 | 0.05 | 34000 | 0.45 | 600 | 1 | 2 | 600 |
| 26 | 17200 | 9 | 0.23 | 154800 | 2.06 | 600 | 3 | 9 | 1800 |
| 27 | 20000 | 3 | 0.08 | 60000 | 0.80 | 600 | 1 | 3 | 600 |
| 28 | 42000 | 2 | 0.05 | 84000 | 1.12 | 600 | 1 | 2 | 600 |
| 29 | 85400 | 2 | 0.05 | 170800 | 2.27 | 600 | 1 | 2 | 600 |
| 30 | 4400 | 1 | 0.03 | 4400 | 0.06 | 600 | 0 | 0 | 0 |
| 31 | 4600 | 1 | 0.03 | 4600 | 0.06 | 600 | 0 | 0 | 0 |
| 32 | 5400 | 1 | 0.03 | 5400 | 0.07 | 600 | 0 | 0 | 0 |
| 33 | 7200 | 1 | 0.03 | 7200 | 0.10 | 600 | 0 | 0 | 0 |
| 34 | 9600 | 1 | 0.03 | 9600 | 0.13 | 600 | 0 | 0 | 0 |
| 35 | 10000 | 1 | 0.03 | 10000 | 0.13 | 600 | 0 | 0 | 0 |
| 36 | 11200 | 1 | 0.03 | 11200 | 0.15 | 600 | 0 | 0 | 0 |
| 37 | 11400 | 1 | 0.03 | 11400 | 0.15 | 600 | 0 | 0 | 0 |
| 38 | 12000 | 1 | 0.03 | 12000 | 0.16 | 600 | 0 | 0 | 0 |
| 39 | 12800 | 1 | 0.03 | 12800 | 0.17 | 600 | 0 | 0 | 0 |
| 40 | 13600 | 1 | 0.03 | 13600 | 0.18 | 600 | 0 | 0 | 0 |
| 41 | 14000 | 1 | 0.03 | 14000 | 0.19 | 600 | 0 | 0 | 0 |
| 42 | 18000 | 1 | 0.03 | 18000 | 0.24 | 600 | 0 | 0 | 0 |
| 43 | 25000 | 1 | 0.03 | 25000 | 0.33 | 600 | 0 | 0 | 0 |
| 44 | 27600 | 1 | 0.03 | 27600 | 0.37 | 600 | 0 | 0 | 0 |
| 45 | 34000 | 1 | 0.03 | 34000 | 0.45 | 600 | 0 | 0 | 0 |
| 46 | 39400 | 1 | 0.03 | 39400 | 0.52 | 600 | 0 | 0 | 0 |
| 47 | 42600 | 1 | 0.03 | 42600 | 0.57 | 600 | 0 | 0 | 0 |
| 48 | 45000 | 1 | 0.03 | 45000 | 0.60 | 600 | 0 | 0 | 0 |
| 49 | 47200 | 1 | 0.03 | 47200 | 0.63 | 600 | 0 | 0 | 0 |
| 50 | 50400 | 1 | 0.03 | 50400 | 0.67 | 600 | 0 | 0 | 0 |
| 51 | 51200 | 1 | 0.03 | 51200 | 0.68 | 600 | 0 | 0 | 0 |
| 52 | 60000 | 1 | 0.03 | 60000 | 0.80 | 600 | 0 | 0 | 0 |
| 53 | 70000 | 1 | 0.03 | 70000 | 0.93 | 600 | 0 | 0 | 0 |
| 54 | 74000 | 1 | 0.03 | 74000 | 0.99 | 600 | 0 | 0 | 0 |
| 55 | 85200 | 1 | 0.03 | 85200 | 1.13 | 600 | 0 | 0 | 0 |
| 56 | 88000 | 1 | 0.03 | 88000 | 1.17 | 600 | 0 | 0 | 0 |
| 57 | 92200 | 1 | 0.03 | 92200 | 1.23 | 600 | 0 | 0 | 0 |
| 58 | 96000 | 1 | 0.03 | 96000 | 1.28 | 600 | 0 | 0 | 0 |
| 59 | 100000 | 1 | 0.03 | 100000 | 1.33 | 600 | 0 | 0 | 0 |
| 60 | 103000 | 1 | 0.03 | 103000 | 1.37 | 600 | 0 | 0 | 0 |
| 61 | 123000 | 1 | 0.03 | 123000 | 1.64 | 600 | 0 | 0 | 0 |
| 62 | 136000 | 1 | 0.03 | 136000 | 1.81 | 600 | 0 | 0 | 0 |
| 63 | 137000 | 1 | 0.03 | 137000 | 1.82 | 600 | 0 | 0 | 0 |
| 64 | 144800 | 1 | 0.03 | 144800 | 1.93 | 600 | 0 | 0 | 0 |
| 65 | 177600 | 1 | 0.03 | 177600 | 2.36 | 1200 | 0 | 0 | 0 |
| 66 | All applicants from Serial no 30 to 65 for minimum allotment of 600 shares | | | | | 600 | 5 | 36 | 3000 |
| 67 | 694 Allottees from Serial no 2 to 66 Additional 1 lot 200 shares | | | | | 200 | 2 | 694 | 400 |
| **GRAND TOTAL** | | **3936** | **100.00** | **7509600** | **100.00** | | | | **710800** |

3. **Allotment to Individual Investors (After Technical Rejections):** The Basis of Allotment to the Individual Investors, at the Issue Price of ₹ 585 per Equity Share, was finalised in consultation with BSE Limited. The total number of shares allocated in this category is 711200 Equity Shares and after that the category was subscribed by 6.32 times. The category-wise details of the Basis of Allotment are as under:

| No. of Shares Applied for (Category wise) | No. of Applications Received | % of Total | Total No. of Shares Applied in Each Category | % of Total | No of Equity shares Allocated per Applicant | Ratio | Ratio | Total No. of shares allotted |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 400 | 11229 | 100.00 | 4491600 | 100.00 | 400 | 19 | 120 | 711200 |

The Board of Directors of the Company at its meeting held on July 14, 2025, has taken on record the Basis of Allotment of Equity Shares, as approved by the Designated Stock Exchange viz. BSE Limited and has authorized the corporate action for the allotment of the Equity Shares to various successful applicants.

The CAN- cum-allotment advices and/or notices will forward to the Email Id's and address of the applicants as registered by the depositories/ as filed in the application form on or before July 15, 2025 . Further, the instructions to Self Certified Syndicate Banks were being processed on July 14, 2025. In case the same is not received within ten days, investors may contact the Registrar to the issue at the address given below. The Equity Shares allocated to successful applicants shall be uploaded on July 15, 2025 for credit into the respective beneficiary accounts subject to validation of the account details with depositories concerned. The Company is in the process of obtaining approval from BSE Limited and the trading of the equity shares is expected to commence trading on July 16, 2025.

**Note:** All capitalized terms used and not defined herein shall have the respective meanings assigned to them in the Prospectus dated July 02, 2025 ("Prospectus").

### INVESTOR PLEASE NOTE

**The details of the allotment made has been hosted on the website of the Registrar to the Issue, Cameo Corporate Services Limited at Website: www.cameoindia.com**

All future correspondence in this regard may kindly be addressed to the Registrar to the Issue quoting full name of the First/Sole Bidder Serial number of the ASBA Form, Number of Equity Shares bid for, Bidder DP ID, Client ID, PAN, date of submission of the Bid cum Application Form, address of the Bidder, the name and address of the Designated Intermediary where the Bid cum Application Form was submitted and copy of the acknowledgement Slip received from the Designated Intermediary and payment details at the address given below:

CAMEO

**CAMEO CORPORATE SERVICES LIMITED**
Subramanian Building, No. 1, Club House Road, Chennai – 600 002. | **Tel No.:** +91 - 44 – 40020700 (5 Lines)
**E-mail:** priya@cameoindia.com | **Website:** www.cameoindia.com
**Investor Grievance Email:** investor@cameodina.com
**Contact Person:** K. Sreepriya | **SEBI Registration. No.:** INR000003753

**For CFF Fluid Control Limited**
**On behalf of the Board of Directors**
Sd/-
**Sunil Menon**
**Managing Director**
**DIN:** 00409485

**Date:** July 15, 2025
**Place:** Mumbai

**LEVEL OF SUBSCRIPTION SHOULD NOT BE TAKEN TO BE INDICATIVE OF EITHER THE MARKET PRICE OF THE EQUITY SHARE ON LISTING OR THE BUSINESS PROSPECTS OF CFF FLUID CONTROL LIMITED.**

***Declaimer:*** CFF Fluid Control Limited has filled the Prospectus dated July 02, 2025 with the Registrar of Companies, Mumbai SEBI and the Stock Exchange. The Prospectus is available on the website of the Lead Manager at www.afsl.co.in and Company at www.cffdefensys.com and shall also be available on the website of the BSE and SEBI. Investors should note that investment in Equity Shares involves a high risk and for the details relating to the issue, please see "Risk Factors" beginning on page 20 of the Prospectus.

The Equity Shares have not been and will not be registered under the U.S. Securities Act 1933, as amended (the "Securities Act") or any state securities laws in the United States and unless so registered, and may not be issued or sold within the United States, except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the Securities Act and in accordance with any applicable U.S. state securities laws. The Equity Shares are being issued and sold outside the United States in 'offshore transactions' in reliance on Regulation under the Securities Act and applicable laws of each jurisdiction where such Issue and sales are made. There will be no public issuing in the United States.

AdBaaz

## निवडक



### सूर्यवंशीची गोलंदाजीत कमाल!

**पुणे :** १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने इंग्लंड दौऱ्यातील १९ वर्षांखालील वनडे मालिकेत फलंदाजीत आपली धमक दाखवून दिली. पाच सामन्यांच्या मालिकेत ३५५ धावा करत तो या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा बॅटर ठरला. एवढेच नाही तर ५५ चेंडूतील शतकी खेळीसह त्याने वर्ल्ड रेकॉर्डही सेट केला. आता कसोटीत त्याने गोलंदाजी करताना इतिहास रचला आहे. वनडे मालिकेनंतर भारत अंडर १९ विरुद्ध इंग्लंड अंडर १९ संघात कसोटी सामना खेळवण्यात येत आहे. या कसोटी सामन्यात वैभव सूर्यवंशी याने गोलंदाजी करताना एक विकेट घेतली. ही विकेट आपल्या खात्यात जमा करताच वैभव सूर्यवंशीच्या नावे खास रेकॉर्डची नोंद झाली आहे. वैभव सूर्यवंशीनं १९ वर्षांखालील इंग्लंड संघाचा कर्णधार हमजा शेख याच्या रुपात टेस्टमध्ये पहिली विकेट घेतली. यासह यूथ टेस्टमध्ये सर्वात कमी वयात विकेट घेणारा तो भारतीय गोलंदाज ठरला आहे. वैभव सूर्यवंशीनं १४ वर्षे १०७ दिवस वयात ही विकेट घेतली. इंग्लड अंडर १९ संघाविरुद्धच्या कसोटी सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय संघाने ५४० धावा केल्या. भारताकडून आयुष म्हात्रेनं १०२ धावांची खेळी केली. याशिवाय अभिज्ञान कुंडू याने ९० धावा तर राहुल कुमार याच्या भात्यातून ८५ धावांची खेळी पाहायला मिळाली.

### वृद्ध धावपटू फौजा सिंग यांचे निधन

**पंजाब :** जगातील सर्वात वयस्कर मॅरेथॉन धावपटूचा किताब पटकवणारे फौजा सिंग यांचे सोमवारी वयाच्या ११४ व्या वर्षी रस्ते अपघातात निधन झाले. त्यांचा जन्म १ एप्रिल १९११ रोजी जालंधरच्या बियास गावात झाला. सोमवारी दुपारी जालंधर-पठाणकोट महामार्गावर एका कारने त्यांना धडक दिली. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. यानंतर, त्यांना लगेच रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण, त्यांना वाचवण्यात अपयश आले. सायंकाळी ७.३० वाजता त्यांचे निधन झाले. पंजाबचे राज्यपाल गुलाब चंद कटारिया यांनी त्यांच्या अधिकृत फेसबुक अकाउंटवर पोस्टमध्ये लिहिले आहे की,प्रसिद्ध मॅरेथॉन धावपटू आणि लवचिकता आणि आशेचे प्रतीक असलेले सरदार फौजा सिंग जी यांच्या निधनाने मला खूप दुःख झाले आहे. वयाच्या ११४ व्या वर्षीही ते त्यांच्या उत्साहाने तरुणांना प्रेरणा देत राहिले. डिसेंबर २०२४ मध्ये त्यांच्या गावी बियास, जिल्हा जालंधर येथून निघालेल्या दोन दिवसांच्या नशा मुक्त - रंगला पंजाब या पदयात्रेत त्यांच्यासोबत चालण्याचा मान मला मिळाला. आज त्यांच्या गावात झालेल्या एका रस्ते अपघातात त्यांचे निधन झाले हे ऐकून खूप दुःख झाले. निरोगी आणि ड्रग्जमुक्त पंजाबसाठी लढणाऱ्यांच्या हृदयात त्यांचा वारसा कायमचा जिवंत राहील. त्यांच्या कुटुंबियांना आणि जगभरातील चाहत्यांना माझ्या मनापासून संवेदना. त्यांच्या आत्म्याला चिरंतन शांती लाभो, असंही पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे.



### वेस्ट इंडिजचा २७ धावांतच खुर्दा

**नवीदिल्ली :** सबिना पार्क इथे झालेल्या डे नाईट कसोटीत यजमान वेस्ट इंडिजवर २७ धावांतच बाद होण्याची नामुष्की ओढवली. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातली ही दुसरी नीचांकी धावसंख्या आहे. विजयासाठी २०४ धावांचं लक्ष्य मिळालेल्या वेस्ट इंडिजने १४.३ षटकातच शरणागती पत्करली आणि ऑस्ट्रेलियाने १७६ धावांनी विजय मिळवला. ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांच्या मालिकेत ३-० असं निर्भेळ यश मिळवलं.डावखुरा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने १००व्या कसोटीत ४०० विकेट्सचा टप्पा गाठला. स्टार्कने दुसऱ्या डावात पहिल्याच षटकात तीन विकेट्स घेत वेस्ट इंडिजच्या डावाला खिंडार पाडलं. स्टार्कने सगळ्यात कमी वेळात पाच विकेट्स पटकवण्याची करामत केली. स्टार्कने ७.३ षटकात ९ धावांच्या मोबदल्यात ६ विकेट्स घेतल्या. नॅथन लॉयनच्या जागी संधी मिळालेल्या बोलँडने हॅटट्रिक घेत निवड योग्य ठरवली. बोलँडने जस्टीन ग्रीव्हज, शामर जोसेफ आणि जोमेल वॉरिकन यांना बाद करत खास विक्रम नावावर केला.



### सात्त्विक-चिराग येणार फार्मात?

**टोकियो :** सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या पुरुष दुहेरीतील जोडीवर जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारताची मदार असणार आहे. याप्रसंगी सात्त्विक-चिराग जोडी आपला शानदार फॉर्म कायम राखण्याचा प्रयत्न करेल. तसेच उपांत्यपूर्व, उपांत्य फेरीपर्यंत मजल मारत असलेल्या या जोडीला जेतेपदाचा दुष्काळ संपवण्यासाठीही प्रयत्न करावे लागणार आहेत. सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीला जागतिक क्रमवारीत १५ वे मानांकन आहे. सात्त्विक-चिराग जोडीने यंदाच्या मोसमात तीन वेळा उपांत्य फेरी गाठली. तसेच एक वेळा उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली आहे, मात्र मागील काही महिन्यांमध्ये सात्त्विक व चिराग या दोन्ही खेळाडूंना दुखापतीने ग्रासले. आता हे दोन्ही खेळाडू पूर्णपणे तंदुरुस्त आहेत. जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील सलामीच्या लढतीत त्यांच्यासमोर कँग मिन ह्यूक-कि डाँग जू या कोरियन जोडीचे आव्हान असेल. जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील एकेरी विभागात पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेन या दोन खेळाडूंवर अधिक लक्ष असणार आहे.



# रवींद्र जडेजाची झुंज अपयशी

## इंग्लंडचा लॉर्ड्समध्ये २२ धावांनी विजय

**। बर्मिंगहॅम । वृत्तसंस्था ।**

**इंग्लंडने ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडमध्ये तिसऱ्या कसोटी सामन्यात विजय मिळवला आहे. इंग्लंडने साम न्यातील पाचव्या दिवशी १४ जुलैला टीम इंडियावर २२ धावांनी मात केली आहे. इंग्लंडने यासह या मालिकेतील दुसरा विजय मिळवला आहे. इंग्लंडने टीम इंडियासमोर १९३ धावांचं आव्हान ठेवलं होतं.**



मात्र इंग्लंडच्या गोलंदाजांसमोर भारतीय फलंदाजांनी गुडघे टेकले. केएल राहुल याच्यानंतर रवींद्र जडेजाने इंग्लंडसमोर संघर्ष केला. अखेरच्या क्षणी नितीश कुमार रेड्डी, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज या तिघांनीही रवींद्र जडेजाला चांगली साथ दिली. मात्र टीम इंडिया विजयी धावांपर्यंत पोहचण्यात अपयशी ठरली.

भारतीय गोलंदाजांनी चौथ्या दिवशी अप्रतिम सुरुवात केली. मोहम्मद सिराज याने इंग्लंडला पहिले २ झटके दिले. त्यानंतर नितीश कुमार रेड्डी, आकाश दीप या दोघांनी १-१ विकेट घेत इंग्लंडच्या फलंदाजांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. वॉशिंग्टन सुंदर याने नावाप्रमाणे सुंदर कामगिरी करत इंग्लंडच्या चौघांना तंबूत पाठवलं. तर जसप्रीत बुमराह याने २ विकेट्स घेतल्या. इंग्लंडने चौथ्या दिवसा-चा खेळ संपेपर्यंत भारताला ४ झटके दिले. यशस्वी जैस्वाल याला भोपळाही फोडता आला नाही. करुण नायर या डावातही मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला. करुण १४ धावांवर बाद झाला. कर्णधार शुबमन गिल ६ रन्सवर एलबीडब्ल्यू झाला. तर नाईट वॉचमॅन आकाश दीप याच्या रुपात भारताने चौथ्या दिवशी चौथी आणि शेवटची विकेट गमावली.

टीम इंडियाने खेळ संपेपर्यंत अशाप्रकारे ४ आऊट ५८ रन्स केल्या. त्यामुळे भारताला पाचव्या दिवशी १३५ धावांची गरज होती. तर इंग्लंड ६ विकेट्सने दूर होती. त्यामुळे पाचव्या दिवशी कोण जिंकणार? याकडे क्रिकेट चाहत्यांना प्रतिक्षा होती. पाचव्या दिवशी केएल राहुलसह उपकर्णधार ऋषभ पंत मैदानात आला. या जोडीकडून फार अपेक्षा होत्या. मात्र पहिला १ तास भारतासाठी आव्हानात्मक होता. त्यामुळे पंत आणि केएलसमोर सांभाळून खेळण्याचं आव्हान होतं. मात्र ज्याची भीती तेच झालं. जोफ्रा आर्चर याने पंतला ९ धावांवर बोल्ड करत पाचवा झटका दिला. त्यानंतर टीम इंडियाला आणखी मोठा झटका लागला. केएल राहुल ३९ धावा करुन एलबीडब्ल्यू झाला. वॉशिंग्टन सुंदर याला भोपळाही फोडता आला नाही. सुंदर आऊट झाल्याने टीम इंडियाचा स्कोअर ७ आऊट ८२ असा झाला. एका बाजूला टीम इंडिया विकेट गमावत होती. तर रवींद्र जडेजा दुसरी बाजू लावून होता. भारताने ७ विकेट्स गमावल्याने पुढील काही षटकातंच इंग्लंड जिंकेल असं वाटतं होतं. मात्र नितीश कुमार रेड्डी, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज या तिघांनी जडेजाला साथ देत इंग्लंडला विजयासाठी संघर्ष करायला लावला.

नितीश आणि जडेजा या दोघांनी आठव्या विकेटसाठी ९२ बॉलमध्ये ३० रन्सची पार्टनरशीप केली. नितीश ५३ चेंडूत १३ धावा करुन मैदानाबाहेर गेला. भारताने आठवी विकेट गमावली. मात्र जडेजा मैदानात असल्याने भारताला आशा होती.जडेजाची साथ देण्यासाठी जसप्रीत बुमराह मैदानात आला. या दोघांनी नवव्या विकेटसाठी इंग्लंडला चांगलंच झुंजवलं. या दोघांनी नवव्या विकेटच्या पार्टनरशीपमध्ये १३३ बॉलचा सामना केला. अखेर ही जोडी फुटली. बुमराह मोठा फटका मारण्याच्या मोहात कॅच आऊट झाला. बुमराहने फक्त ५ धावा केल्या. मात्र बुमराहची साथ महत्त्वाची ठरली. बुमराहने ५४ चेंडूंचा सामना केला. त्यामुळ टीम इंडिया सामन्यात कायम होती.

बुमराह आऊट झाल्यानंतर मोहम्मद सिराज आला. जडेजाने या दरम्यान सलग चौथं अर्धशतक ठोकलं. तर दुसऱ्या बाजूने सिराजही जडेजाला चांगली साथ दिली. आता भारताला २२ धावांचीच गरज होती. एका बाजूला जडेजा चिवटपणे खेळत होता. तर सिराजही सावधपणे खेळत होता. मात्र शोएब बशीर याने ७५ व्या ओव्हरमधील टाकलेल्या पाचव्या बॉलवर टीम इंडियाचा डाव आटोपला.

# ऑलिम्पिक क्रिकेट स्पर्धेची तारीख ठरली

**। लॉस एंजेलिस । वृत्तसंस्था ।**



२०२८ मध्ये लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत क्रिकेटचा समावेश आहे. टी २० फॉर्मेटमध्ये ही स्पर्धा होणार आहे. त्यामुळे उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. ही स्पर्धा १२ जुलै २०२८ पासून २९ जुलै २०२८ पर्यंत असणार आहे. १८ दिवस ही स्पर्धा असणार आहे. कॅलिफोर्नियातील पोमोना येथील फेअरग्राउंड्स क्रिकेट स्टेडियममध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. क्रिकेट सामन्यांचा पहिला टप्पा १२ ते १८ जुलै दरम्यान होईल, दुसऱ्या टप्प्यातील सामने २२ ते २८ जुलै दरम्यान होतील. अंतिम सामना २९ जुलै रोजी होईल.

ऑलिम्पिक स्पर्धेसाठी संघांची निवड आयसीसी टी २० संघांच्या क्रमवारीच्या आधारे होणार आहे. क्रमावारीनुसार पहिल्या सहा संघांचा विचार केला आहे. लॉस एंजेलिस ऑलिंपिकचे आयोजन करणाऱ्या यूएसए संघाला क्रिकेट स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी मिळण्याची शक्यता आहे. भारत, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांग्लादेश, इंग्लंड, आयर्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, वेस्ट इंडीज, झिम्बाब्वे या संघातून सहा संघ हे ऑलिम्पिकसाठी पात्र ठरतील. या स्पर्धेत ६ पुरुष आणि ६ महिला क्रिकेट संघ असतील. प्रत्येक संघात १५ सदस्य असतील. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीने २०२८ च्या खेळांमध्ये समाविष्ट होणाऱ्या पाच नवीन खेळांमध्ये बेसबॉल, सॉफ्टबॉल, फ्लॅग फुटबॉल, लॅक्रोस आणि स्क्वॅशसह क्रिकेटला मान्यता दिली आहे.

## पोलार्डची वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी!

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**



न्यूयॉर्कच्या संघाने मेजर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेतील फायनल जिंकत जेतेपदावर नाव कोरले. मुंबई इंडियन्स फ्रँचायझी संघाच्या या विजयासह या ताफ्यातून खेळणाऱ्या पोलार्डनं वर्ल्ड रेकॉर्डची बरोबरी साधली आहे. पोलार्ड आता संयुक्तरित्या सर्वाधिक टी-२० फायनल जिंकणारा खेळाडू ठरला आहे.केरॉन पोलार्डनं आतापर्यंत ३० टी-२० फायनल खेळला असून १७ व्या वेळी त्याने फायनल जिंकली आहे. पोलार्डनं आपलाच सहकारी ब्रावो याच्या वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी केली. ब्रावोनं २६ टी-२० सामन्यातील फायनलमध्ये १७ वेळा विजय मिळवला आहे. पाकिस्तानी शोएब मलिकचाही या यादीत समावेश आहे. त्याने २२ पैकी १६ टी-२० फायनल जिंकल्याचा रेकॉर्ड आहे.रोहित शर्मानं १८ वेळा टी-२० फायनल खेळताना ११ वेळा विजय मिळवल्याची नोंद आहे. कॅरेबियन अष्टपैलू सुनील नरेनही टॉप ५ मध्ये आहे.

## दक्षिण आफ्रिकेची विजयी सलामी

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेने त्रिसदस्यीय मालिकेतील पहिल्या टी २० सामन्यात झिंबाब्वेवर ५ विकेट्सने मात करत विजयी सलामी दिली आहे.

यजमान झिंबाब्वेने कर्णधार सिकंदर रझा याच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेसमोर १४२ धावांचं माफक आव्हान ठेवलं होतं. दक्षिण आफ्रिकेने हे आव्हान २५ बॉलआधी ५ विकेट्स गमावून पूर्ण केलं. दक्षिण आफ्रिकेच्या विजयात रुबीन हर्मन याने प्रम ुख भूमिका बजावली. रुबीनने ३७ बॉलमध्ये ५ फोर आणि १ सिक्ससह ४५ रन्स केल्या. बेबी एबी म्हणून प्रसिद्ध असेल्या डेवाल्ड ब्रेव्हीस याने १७ बॉलमध्ये ५ सिक्स आणि १ फोरसह स्फोटक ४१ रन्स केल्या. त्याआधी रिझा हेंड्रीक्स याने ११ तर कॅप्टन रॅसी वॅन डुसेन याने १६ धावा जोडल्या. तर कॉर्बिन बॉश आणि जॉर्ज लिंडे या जोडीने दक्षिण आफ्रिकेला विजयापर्यंत पोहचवलं. कॉर्बिनने १५ बॉलमध्ये नॉट आऊट २३ रन्स केल्या. तर जॉर्ज ३ धावांवर नाबाद परतला. झिंबाब्वेकडून रिचर्ड नगारावा याने ३ विकेट्स घेतल्या. तर ट्रेव्हर ग्वांडू याने दक्षिण आफ्रिकेच्या दोघांना बाद केलं. त्याआधी दक्षिण आफ्रिकेने टॉस जिंकून झिंबाब्वेला बॅटिंगसाठी भाग पाडलं. झिंबाब्वेसाठी कॅप्टन सिकंदर रझा याने ३८ बॉलमध्ये ५४ रन्स केल्या.

## फिफा क्लब विश्वचषक स्पर्धेत चेल्सीला विजेतेपद

**। ईस्ट रुदरफोर्ड । वृत्तसंस्था ।**



कोल पाल्मरच्या दोन गोलच्या जोरावर चेल्सीने युरोपीय विजेत्या पॅरिस सेंट-जर्मेन संघावर अंतिम सामन्यात ३-० असा विजय मिळवत 'फिफा' क्लब विश्वचषक फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले. त्याला जोआओ पेड्रोने एक गोल करीत चांगली साथ दिली.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच चेल्सीने आक्रमक खेळ केला. २२व्या मिनिटाला चेल्सीला आघाडी घेण्याची संधी मिळाली. त्यांच्याकडून पाल्मरने गोल करीत संघाला १-० असे आघाडीवर नेले. यानंतर आठ मिनिटांनी पाल्मरने आणखी एक गोल करीत संघाची आघाडी २-० अशी भक्कम केली. यानंतर ४३व्या मिनिटाला पेड्रोने पाल्मरच्या पासवर पॅरिस सेंट-जर्मेनचा गोलरक्षक जियानलुइगी डोनारुम्म ाला चकवित गोल करीत संघाला ३-० अशा स्थितीत पोहोचवले. पेड्रोचा दोन जुलैनंतर चेल्सी संघासोबत आल्यानंतरचा हा तिसरा गोल ठरला. दोन वर्षांपूर्वी मँचेस्टर सिटीकडून चेल्सीसोबत आलेल्या पाल्मरने या हंगामात १८ गोल केले आहेत. पॅरिस सेंट-जर्मेन संघाने सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, चेल्सीच्या भक्कम बचावफळीसमोर निभाव लागला नाही. त्यांना सामन्यातील अखेरची काही मिनिटे दहा खेळाडूंसह खेळावे लागले. कारण, सामन्याच्या ८४व्या मिनिटाला मार्क कुकुरेलाचे केस पकडून पाडल्याने जोआओ नेवेसला लाल कार्ड दाखविण्यात आले. त्यामुळे त्याला मैदानाबाहेर जावे लागले. या स्पर्धेपूर्वी पॅरिस सेंट-जर्मेन संघ चांगल्या लयीत होताया सत्रात लीग-१, कूप डी फ्रान्स आणि आपले पहिले चॅम्पियन्स लीग जेतेपद मिळवले होते. ते हंगामात आपले चौथे जेतेपद मिळवण्याच्या प्रयत्नात होते. त्यांना यामध्ये अपयश आले. मेटलाइफ स्टेडियम येथे झालेला अंतिम सामना पाहण्यासाठी ८१,१८८ चाहत्यांची उपस्थिती होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंपही सामना पाहण्यासाठी उपस्थित होते.

**वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप गुणतालिका | टीम इंडियापेक्षा अजूनही श्रीलंकन भारी!**

# ऑस्ट्रेलिया संघ १०० टक्केसह टॉपर!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**जमैका येथील किंग्स्टन सबिना पार्कच्या मैदानात वेस्ट इंडिज संघाचा धुव्वा उडवत ऑस्ट्रेलियन संघाने १०० टक्के विजयी टक्केवारीसह २०२५-२७ च्या चक्रात आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. दुसऱ्या बाजूला भारतीय संघाला लॉर्ड्सवरील पराभवामुळे मोठा फटका बसला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत श्रीलंकन संघ टीम इंडियावर भारी ठरताना दिसत आहे.**



ऑस्ट्रेलियन संघाने वेस्ट इंडिज विरुद्धच्या मालिकेतून नव्या आणि चौथ्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या हंगामाला सुरुवात केली. दुसऱ्या बाजूला भारतीय संघाने इंग्लंड दौऱ्यावरुन नव्या चक्राची सुरुवात केली आहे. ऑस्ट्रेलियन संघाने वेस्ट इंडिज दौऱ्यातील तीन सामन्यांची कसोटी मालिका ३-० अशी जिंकली आहे. सर्वाधिक ३६ गुणांसह १०० टक्के विनिंग पर्सेंटेजसह ऑस्ट्रेलिया संघ टॉपला आहे. भारत-इंग्लंड यांच्यातील अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी स्पर्धेतील तिसरा कसोटी सामना लंडन येथील लॉर्ड्सच्या मैदानात खेळवण्यात आला. अखेरच्या दिवसापर्यंत रंगतदार झालेला हा सामना जिंकत इंग्लंडच्या संघाने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. २४ गुणांसह त्यांची विजयाची टक्केवारी आता ६६.६७ इतकी आहे.

श्रीलंकेचा संघ बांगलादेशविरुद्धच्या २ कसोटी सामन्यातील १ विजय आणि एक सामना अनिर्णित राखून १६ गुणांसह ६६.६७ टक्के विनिंग पर्सेंटेजसह या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे. टीम इंडियाने आतापर्यंत खेळलेल्या ३ कसोटी सामन्यातील एका सामन्यात विजय मिळवलाय. १२ गुण आणि ३३.३३ विजयी टक्केवारीसह टीम इंडिया क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर आहे.बांगलादेश संघ एक पराभव आणि एका अनिर्णित सामन्यासह ४ गुणांसह १६.६७ अशा विजयी टक्केवारीसह पाचव्या तर वेस्ट इंडिजच्या संघ सहाव्या स्थानावर आहे. न्यूझीलंड, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेच्या संघाने अद्याप नव्या चक्रात एकही कसोटी सामना खेळलेला नाही.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)